

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

एसटीच्या स्मार्ट कार्डला मुदतवाढ

मुंबई : ग्रामीण भागातील अनेक महिला व ज्येष्ठ नागरिकांची एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी अपूर्ण असल्याने एसटी महामंडळाने कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ७ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत स्मार्ट कार्ड नसतानाही प्रवाशांना एसटीच्या सवलतींचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. आतापर्यंत सुमारे १ कोटी १० लाख कार्डांची नोंदणी व वितरण झाले आहे. उर्वरित पात्र लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

रायगड | शनिवार | दि. ७ नोव्हेंबर २०२६ | अंक १५२ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

पटेल ज्वेलर्स®

शुभ दीपावली

त्रिअलंकार महोत्सव

फ्री गोल्ड कॉइन*

घडणावळीवर ३०% सूट

१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर

महाराष्ट्र: पनवेल, पेण, उरण । गुजरात: महेसाणा, मोडासा, लुणावाडा

TELL NO: 022 3104 0000 | ALL DAYS OPEN

निवडक



नेरळ विद्या भवन शाळेत दिवाळी अंक वाचन उपक्रम

कर्जत : कर्जत तालुक्यातील नेरळ विद्या भवन शाळेत दिवाळी अंक वाचन उपक्रम राबवण्यात आला. पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी- छात्र प्रबोधनतर्फे दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात आले होते. आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागून वाचन वेग वाढावा या उद्देशाने ज्ञान प्रबोधिनी-छात्र प्रबोधन पुणे यांनी संस्थेचे माध्यमातून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी धामोते शाळेत अभिनव उपक्रम राबवण्यात आला. सचिन अभंगे यांच्या सहकार्याने यावर्षीचा मदीपोत्सव २०२६ वाचन दिवाळीफम्हणून साजरा करण्यासाठी आवाहन केले आहे. या प्रदर्शनाचा शुभारंभ शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा जोगळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छात्र प्रबोधनचे संपादक महेंद्र सेठिया, शैलजा देशमुख, शिल्पा कुलकर्णी, ज्योती चौधरी, शुभदा कुलकर्णी, नामदेव ढवळे, मंगेश थोरवे, अनुराधा मुरकुटे, संजय चव्हाण, एकनाथ बुरूड, विद्या भुसाळ, पंचशिला जाधव, विकास पाटील आदी उपस्थित होते.



धनत्रयोदशीच्या खरेदीसाठी गर्दी

खांदा कॉलनी : दीपावली सणाला सुरुवात झाली असून, सणाच्या उत्साहाने पनवेलची बाजारपेठ सजली आहे. आज धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर खरेदीसाठी नागरिकांनी बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती. विशेषतः पनवेलमधील भाजी मार्केट परिसरात सकाळपासूनच खरेदीदारांची वर्दळ पाहायला मिळाली. धनत्रयोदशीच्या दिवशी झाडू खरेदी करण्याला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने बाजारात विविध प्रकारचे झाडू विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. पारंपरिक झाडूंसह आकर्षक आणि वेगवेगळ्या आकारांचे झाडू खरेदी करण्याकडे महिलांचा कल दिसून आला. दीपावलीच्या सजावटीसाठी रंगीबेरंगी आकाशकंदील, पणत्या, फुले आणि तोरणांनी बाजारपेठ फुलली आहे. विविध सजावट साहित्य नागरिक खरेदी करत आहेत. झेंडूच्या फुलांसह विविध फुलांच्या माळांनाही चांगली मागणी आहे. दुकानदारांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानांसमोर विविध वस्तूंची आकर्षक मांडणी केली आहे. कुटुंबासह बाजारात आलेले नागरिक दिवाळीच्या खरेदीचा आनंद घेताना दिसत आहेत.



रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी जनजागृती

खांदा कॉलनी : रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या वतीने विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या वतीने पनवेल रेल्वे स्थानकात प्रवाशांना सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात महिला प्रवाशांना डायल १५१२ या लोहमार्ग पोलीस हेल्पलाइन क्रमांकाची माहिती देण्यात आली. रेल्वे स्थानक, फलाट, रेल्वे डबा तसेच प्रवासादरम्यान संशयास्पद व्यक्ती किंवा अनुचित प्रकार आढळल्यास या क्रमांकावर संपर्क साधता येतो, याबाबत जनजागृती करण्यात आली. रेल्वे प्रवासात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणी यांना सुरक्षित वातावरण मिळावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. केवळ घटना घडल्यानंतर मदत करण्याऐवजी अशा घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांकडून जनजागृतीवर भर दिला जात आहे. स्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे अशा प्रकारच्या जनजागृती मोहिमांमुळे प्रवाशांमध्ये सुरक्षा व्यवस्थेबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे. पोलिसांचा खाकी गणवेश हा केवळ कायद्याचा धाक नसून महिलांसाठी विश्वासाचा आधार आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

पाली/बेणसे : गस्तीवर असताना रस्त्यालगत पडलेला सुमारे ४ लाख ५० हजार रुपये किमतीचा लॅपटॉपचा पार्सल बॉक्स हस्तगत करून, सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा दूरक्षेत्र पोलिसांनी अवघ्या काही तासांत सर्व ११ लॅपटॉप मूळ मालकाच्या सुरक्षित स्वाधीन केले आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की सोमवारी (दि.२) रोजी रात्री जांभूळपाडा दूरक्षेत्र हद्दीतील पाली-खोपोली रस्त्यावर पोलीस पथक नेहमीप्रमाणे गस्त करत होते. गस्तीदरम्यान गोंदव फाटा येथे पोलिसांना एक लावारिस पार्सल बॉक्स पडलेला दिसून आला. पोलिसांनी तात्काळ त्या बॉक्सची पाहणी व तपासणी केली असता, त्यात एसर कंपनीचे तब्बल ११ नवीन लॅपटॉप असल्याचे निष्पन्न झाले. पार्सल बॉक्समध्ये सापडलेल्या बिलावरील माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ नमूद क्रमांकांवर संपर्क साधून मुळ मालकास परत केले.

पनवेल शहरात मालवाहू वाहनांचा धुडगूस

■ वाहतूक कोंडीने नागरिक हैराण, बाजारपेठेत वाहनांच्या लांबच लांब रांगा

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला असून, मालवाहू वाहनांच्या बेशिस्त प्रवेशामुळे नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शहरात मालवाहू वाहनांसाठी ठरवून दिलेल्या प्रवेश वेळेचे सर्रास उल्लंघन होत असल्याने मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.

टपाल नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल बाजारपेठ आणि उरण नाका या महत्त्वाच्या परिसरात वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अवजड आणि मालवाहू वाहने रस्त्यांवर उभी राहत असल्याने अन्य वाहनचालकांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागत आहे.



विशेषतः सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत या कोंडीत मोठी भर पडते. दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच पादचाऱ्यांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा काही मिनिटांच्या अंतरासाठी नागरिकांना अर्धा ते एक तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागते.

धक्कादायक बाब म्हणजे, शहरातील या महत्त्वाच्या चौकांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांची नियमित उपस्थिती दिसून येत नाही. त्यामुळे वाहनचालकांकडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र आहे.

एकीकडे शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना दुसरीकडे वाहतूक नियोजनाकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची नाराजी नागरिक व्यक्त करीत आहेत. मालवाहू वाहनांच्या प्रवेश वेळेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच गर्दीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची नियमित नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे.

पनवेल शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन आणखी किती काळ वाट पाहणार? मालवाहू वाहनांच्या बेशिस्त प्रवेशाला आळा घालून नागरिकांना दिलासा मिळणार कधी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

जनजागृतीची गरज

वाहतूक नियमाबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. तसेच भरधाव वाहन चालवणे, चौकातून चुकीच्या पद्धतीने गाडी चालवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, सिग्नल सुरू असला तरी रस्त्यावर थांबायचे नाही, असे प्रकार सर्रास सुरू आहेत. त्यामुळे वाहतुकीला शिस्त लावायची कुणी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्जत टेकडीवर आढळला बलून फ्रॉग

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत शहराच्या मध्यवर्ती असलेल्या टेकडीवर कर्जतच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी या मॉर्निंग वॉकसाठी टेकडीवर केल्या असता त्यांना एक नवीन प्रजातीचा दुर्मिळ प्राणी बघायला मिळाला त्यांनी त्वरित त्याचा फोटो काढला. फोटो गुगल वर सर्च केला असता ह्या दुर्मिळ प्रजातीच्या प्राण्याचे नाव बलून फ्रॉग (बेडूक) असे आहे. हा बेडूक पर्पल कलरचा असून आकाराने गोल मटक्यासारखा किंवा फुग्यासारखा फुगीर दिसतो, त्याला धोका जाणवतो तेव्हा स्वतःचे शरीर हवेत फुगून आणखीन मोठा होतो, की प्रजाती प्रामुख्याने भारत, नेपाळ, बांगलादेश आदी ठिकाणी आढळते.



प्रशासनाच्या अनास्थेमुळे नागरिकांचा प्रवास खड्ड्यातून

। पनवेल । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रामध्ये रस्ते दुरुस्तीसाठी इतर महापालिकेला मिळते डांबर, पण पनवेल महानगरपालिकेला डांबर भेटत नाही या वास्तवापासून सुरू झालेला प्रवास आज एकाच ठळक निष्कर्षा येऊन ठेपला आहे. महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्त्यांची झालेली दुर्दशा पाहता, शहराचा विकास नेमका कुठे गेलाय हे वेगळे सांगण्याची गरज उरलेली नाही.

राज्याच्या इतर भागांत महापालिका रस्ते चकाचक करत असताना, पनवेलमध्ये मात्र, डांबराचा तुटवडा असल्याचे अजब कारण पुढे करून प्रशासनाने आपली पाठ करून घेतली आहे. विकासाचे दावे फोल, प्रत्यक्षात खड्ड्यांचे साम्राज्य शहरातील प्रमुख रस्ते असोत वा अंतर्गत



मार्ग, प्रत्येक ठिकाणी खड्ड्यांचे जाळे पसरले आहे.

पावसाळा संपून कित्येक दिवस लोटले तरी रस्त्यांची दुरस्ती न झाल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. ऐन दिवाळीत आणि सणासुदीच्या काळातही पनवेलकरांना या खड्ड्यांमुळे नरकयातना सहन कराव्या लागल्या. खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या महिला, वृद्ध आणि शाळकरी मुलांना या रस्त्यांवरून चालणेही मुश्कील झाले होते.

महानगरपालिकेतील पनवेल खारघर कळंबोली, कामोठे या ठिकाणी अक्षरशः रस्त्याची चाळण झाली आहे याबाबत नागरिकांनी प्रश्न विचारल्यानंतर प्रशासनाची टोलवाटोलवीची उत्तरे दिली जात आहेत आम्हाला डांबर मिळत नाही या एकाच वाक्याच्या आडोशाने महापालिका अधिकारी आणि ठेकेदार आपली जबाबदारी झेटकत आहेत. जर इतर शहरांना डांबर मिळते, तर मग पनवेलला च का मिळत नाही? डांबराच्या खरेदीपासून ते प्रत्यक्ष कामांपर्यंतचा सर्व-काही कारभार कुठल्या खात्यात आणि कोणाच्या फायद्यासाठी चाललाय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

कागदोपत्री होणारे कोट्यवधींच्या विकासाचे फुगीर दावे आणि जमिनीवरचे हे खड्ड्यांचे वास्तव पाहता, पनवेलकरांचा संताप आता अनावर झाला आहे. प्रशासनाने याप्रकरणी तातडीने कठोर पावले उचलून रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम हाती घेतले नाही, तर पनवेलकर तीव्र आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा दिला जात आहे.

आरसीएफमधील प्रबंधन प्रशिक्षणार्थी पदाच्या भरतीसाठी ऑनलाइन मार्गदर्शन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलाइझर्स लिमिटेडमधील नियोजित प्रबंधन प्रशिक्षणार्थी पदाचा विविध शाखांचा भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या ऑन लाईन परीक्षेसंबंधी रायगड जिल्ह्याचे रहिवासी असणाऱ्या अनारक्षित (UR), अनुसूचित जाती-जमाती (SC/ST), इतर मागासवर्गीय (OBC-NCL), आर्थिकदृष्ट्या दुर्बल (EWS) आणि दिव्यांग (PWBD) गटांतील पात्र उमेदवारांना मार्गदर्शन लाभावे यादृष्टीने भरतीपूर्व जागरूकता कार्यक्रम (Pre Recruitment -wareness Programme) (दि.१८) नोव्हेंबर रोजी सकाळी ०९.०० वाजता सुरू होईल. समृद्धी सभागृह, प्रशासकीय



इमारतीचे प्रवेशद्वार, आरसीएफ कारखाना, अलिबाग, येथे आयोजित करण्यात आला आहे. संबंधीत उमेदवारांनी सदरच्या ईमेलची प्रत (हार्ड किंवा सॉफ्ट कॉपी) तसेच आधारकार्ड (प्राधान्याने)/पॅनकार्ड/ड्रायविंग लायसेन्स ची छायाप्रत सोबत घेऊन त्यांना नेमून दिलेल्या वेळेत समृद्धी सभागृह, प्रशासकीय इमारतीचे प्रवेशद्वार, आरसीएफ कारखाना, अलिबाग, येथे उपस्थित रहावे आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.



प्रमोद देशमुखांना 'माणगाव भूषण' पुरस्कार

। माणगाव । प्रतिनिधी ।

सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठान माणगाव यांच्या संयुक्त दीपसंध्या जागर लोककलेचा या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि.३) नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. प्रमोद देशमुख यांना सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठानतर्फे माणगाव भूषण पुरस्कार २०२६ ज्येष्ठ अभिनेते जयराज नायर, ॲड. राजीव साबळे यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी अभिनेत्री रसिका वेंगुरलेकर, योगेश सुपेकर, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, रिया उभारे, ॲड.विनोद घायाळ, नितीन बामगुडे, डॉ. अजय मोरे, अंकिता मोरे, स्वाती गवळी व दीपसंध्या कार्यक्रमातील महिला कलाकार तसेच रसिक प्रेक्षक यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

रस्त्याचे डिव्हायडर भरले गवताने

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत कल्याण राज्य महामार्गावरील दोन्ही बाजूच्या साईड पट्टी व डिव्हायडरमध्ये गवत वाढले आहे. हे गवत कापून साफ करावे अशी मागणी सागर शेळके यांनी केली आहे. दोन दिवसांपूर्वी डिकसळ येथील एक युवकाचे उमरोली येथे अपघात होऊन निधन झाले होते. कोशाणे, डिकसळ अश्या बऱ्याच ठिकाणी रोड ला खड्डे पडलेले आहेत त्याची दुरुस्ती करावी तसेच गवत कापण्यात यावे व रस्त्यावरील खडडे भरून, तसेच गतिरोधक दुरुस्त करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सागर शेळके यांनी केली आहे.

सांस्कृतिक विषयातून साकारली रांगोळी

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दीपावली आणि रांगोळी यांचे एक अतूट नाते आहे. दीपावलीच्या सणात घरासमोर रंगीबेरंगी रांगोळी काढून आनंदाचे आणि मांगल्याचे स्वागत केले जाते. मात्र, यंदा पनवेलमधील नवोदित रांगोळी कलाकारांनी आपल्या कल्पकतेला सामाजिक भानाची जोड देत रांगोळीच्या माध्यमातून विविध विषयांना वाचा फोडली आहे.

रांगोळी म्हणजे केवळ रंगांची कलाकुसर नसून समाजातील घडामोडी मांडण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे या कलाकारांनी दाखवून दिले आहे. वृक्षतोड, कोकणातील जंगलांचे संवर्धन, पाणीटंचाई, देशप्रेम, तसेच कला आणि चित्रपट क्षेत्रातील दिग्गजाची रांगोळ्या साकारण्यात



आल्या आहेत.

रंगदीप क्रिएशनच्या माध्यमातून कलाकारांनी वेगवेगळ्या संकल्पना रंगांच्या माध्यमातून जिवंत केल्या आहेत.

कीर्ती घरत यांनी सेव्ह भीमाशंकर ॲड कोकण फॉरेस्ट ही संकल्पना मांडत जंगल संवर्धनाचा संदेश दिला. नेहा घरत यांनी पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न रांगोळीतून मांडल आहे. ॲड. प्रकाश नवलें यांनी ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे व्यक्तिचित्र साकारले. कशिश टिके यांनी बासरी वाजविणाऱ्या राधेची सुंदर प्रतिमा रंगवली आहे.

हिरकणी महोत्सवाची जल्लोषात सांगता

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवीमुंबई महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने (दि.१) नोव्हेंबरपासून आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय हिरकणी महोत्सवाची (दि.४) नोव्हेंबर रोजी सांगता झाली. महोत्सवाच्या अंतिम दिवशी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवित महिला उद्योजिकांच्या वतीने प्रदर्शनात मांडलेल्या वस्तूंची खरेदी करून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



महोत्सवाच्या अंतिम दिवसाचे बेस्ट हिरकणी पुरस्कार वितरण सोहळा हे प्रमुख आकर्षण ठरले. महोत्सवात सहभागी झालेल्या सुमारे ३०० महिला बचत गट, संस्थांच्या स्टॉलधारक उद्योजिकांमधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तीन महिला उद्योजिकांची निवड करण्यात आली आणि त्यांना बेस्ट हिरकणी पुरस्कार व सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. महिला उद्योजकतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा उद्देश होता. महोत्सवाच्या सांगता समारंभास सुजाता पाटील, सलुजा सुतार, रंजना सोनवणे, शैला पाटील, प्रीती भगत, प्रकाश कांबळे, डॉ. गौतमी सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

मराठी शाळेचे रुपडे पालटले

। माथेरान । प्रतिनिधी ।

शहाराच्या मध्यवर्ती भागात ब्रिटिश कालखंडात सन १८७४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या शाळेला जवळपास १५२ वर्षांची परंपरा लाभली आहे. या शाळेने आजवर असंख्य विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मोलाचे योगदान दिल्यामुळे इथला स्थानिक युवक विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेताना दिसून येत आहेत.

मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, सुनील शिंदे यांनी शाळेचा संपूर्ण कायापालट झालेला दिसून येत आहे. संपूर्ण शाळेला रंगरंगोटी उत्तम आसनव्यवस्था उपलब्ध आहे. मुख्याध्यापक दिलीप अहिरे आणि त्यांचे सहकारी सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम त्याचबरोबर त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध कार्यक्रम राबवित आहेत.

शटलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी | **हंगामातील पहिला सीझन**

माथेरानमध्ये हिवाळी पर्यटन सुरुवात

। नेरळ । प्रतिनिधी ।

निसर्गरम्य वातावरण आणि मनमोहक दृश्ये, हिरव्यागार वनराईतून थंडगार प्रवासाचा मनमुराद आनंद पर्यटक माथेरानला येत असतात. यंदा माथेरानमध्ये हिवाळी पर्यटन हंगाम सुरू झाला आहे. या वर्षी दिवाळी हंगाम चांगला जावा यासाठी नेरळ माथेरान नेरळ मार्गावर किमान पाच फेऱ्या चालवाव्या तर माथेरान अमन लॉज या दरम्यान पर्यटन हंगामात फेऱ्या वाढवण्यात याव्यात अशी मागणी स्थानिक व्यावसायिक यांनी केली आहे.

नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन माथेरान चे व्यवसायाची



जीवन वाहिनी समजली जाते. या मार्गावर १९०७ पासून मिनी ट्रेन सुरू झाली आणि तेंव्हापासून माथेरानमध्ये प्रामुख्याने उन्हाळ्यात पर्यटक येऊ लागले. त्यानंतर मागील दहा पंधरा वर्षात माथेरानचे पर्यटन बदलून गेले आहे.

केवळ दिवाळी,नाताळ आणि नवीन वर्ष तसेच उन्हाळ्यातील दोन महिने येथे पर्यटक यायचे. मात्र, आता सर्वाधिक पर्यटक हे पावसाळ्यात येऊ लागले आहेत.

पावसाळ्यात चार महिने सर्वाधिक पर्यटक माथेरानमध्ये आलेले असून दिवाळी हंगाम हा माथेरानमधील सर्वात पहिला सीझन समजला जातो.

त्यात पावसाळी सुट्टीवर गेलेली मिनी ट्रेन १५ ऑक्टोबर रोजी पुन्हा सुरू होत असते,

> **"पर्यटन हंगामात सोमवार ते शुक्रवार सहा ऐवजी आठ आणि शनिवार-रविवार आठ ऐवजी दहा फेऱ्या कराव्यात. एक वस्तीची गाडी आणि दिवसाच्या फेऱ्या चार ते पाच अशी मागणी रेल्वेकडून मान्य झाल्यास मोठ्या प्रमाणावर पर्यटन व्यवसाय बहरेल.**
> **-सुभाष भोसले**
> **व्यावसायिक"**

त्यामुळे दिवाळी हंगामात माथेरानचे हिवाळी पर्यटन सुरू होते.

यावर्षी दोन दिवसावर दिवाळी सण येऊन देखील माथेरानमध्ये पर्यटक नाहीत. माथेरानमधील पर्यटन हे प्रामुख्याने नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन आणि माथेरान अमन लॉज शटल सेवेवर अवलंबून असते.

यावर्षी मिनी ट्रेनचा पर्यटन हंगाम सुरू झाला आहे,पण मिनी ट्रेनच्या नेरळ माथेरान नेरळ दरम्यान केवळ दोनच फेऱ्या सुरू आहेत. माथेरान ते अमन लॉज सेवेच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी व्यावसायिक वसंत कदम यांनी व्यक्त केली आहे.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. ७ नोव्हेंबर २०२६ | अंक १५२ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

त्या ऑडिओ क्लिपचे मूळ डिव्हाईस कदमांकडे!

मुंबई : ५०० कोटींच्या कथित व्यवहाराचा उल्लेख असलेल्या व्हायरल ऑडिओ क्लिपवरून मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मोठा दावा केला आहे. या क्लिपचे मूळ डिव्हाईस शिवसेना नेते रामदास कदम यांच्याकडे असून, त्यांच्याकडूनच क्लिपचा स्रोत घ्यावा, असे जरांगे यांनी म्हटले आहे. रामदास कदम यांनी आपल्याआधी दोन तास ही क्लिप वाजवली होती, असाही दावा त्यांनी केला. दरम्यान, आपल्या विरोधात बोलण्यासाठी ३० ते ३५ जणांची टोळी तयार करण्यात आली असून, त्यांना पूर्ण ताकद दिली जात असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला.

क्रिमीलेअरबाबत ओबीसींना दिलासा

नवी दिल्ली : ओबीसी आरक्षणातील क्रिमी लेअर निश्चित करण्याच्या निकषांवर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत केंद्र सरकारला मोठा धक्का दिला आहे. पालकांचे वेतन आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न हे क्रिमीलेअर ठरवण्याचे एकमेव निकष असू शकत नाहीत, असे स्पष्ट करत न्यायालयाने केंद्र सरकारची पुनर्विचार याचिका फेटाळली आहे. तसेच चुकीच्या निकषांमुळे नियुक्तीपासून वंचित राहिलेल्या पात्र ओबीसी उमेदवारांना नियुक्ती देण्याचे निर्देशही दिले आहेत. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने ११ मार्च २०२६ रोजी दिलेला निर्णय कायम ठेवला.

वेधक

एकाच कुटुंबातील सात जणांची हत्या

नवी दिल्ली : कौटुंबिक वादातून संतापलेल्या एका कॅबचालकाने स्वतःच्या पत्नी, सासू, मेहुणे, मेहुणी आणि सात वर्षांच्या मुलासह एकाच कुटुंबातील सात जणांची हत्या केल्याची धक्कादायक घटना बंगळुरूमध्ये उघडकीस आली आहे. इंदुशेखर असे आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे. दोन दिवसांत सात जणांची हत्या केल्याची कबुली त्याने दिल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, पत्नी सुनीता हिचे माहेरच्या कुटुंबियांशी असलेले जवळचे संबंध आणि वारंवार माहेरी जाण्यावरून पती-पत्नीमध्ये वाद होत होते. याच रागातून आरोपीने हत्येचे नियोजन केल्याचा संशय आहे.

दीर-सासूसह तिघांना सशर्त जामीन

मुंबई : पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय देत दीर सुशील हगवणे, सासू लता हगवणे आणि निलेश चव्हाण या तिघांना सशर्त जामीन मंजूर केला आहे. मात्र, जामीन मिळणे म्हणजे निर्दोष सुटका नव्हे, असे स्पष्ट करत न्यायालयाने आरोपींवर कडक अटी घातल्या आहेत. न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव यांनी आरोपींची भूमिका, उपलब्ध पुरावे आणि तपासाची स्थिती विचारात घेऊन हा निर्णय दिला. तिघांना प्रत्येकी २५ हजारांचा वैयक्तिक बाँड आणि तेवढ्याच रकमेचा जामीनदार द्यावा लागणार आहे. न्यायालयाच्या परवानगीशिवाय महाराष्ट्राबाहेर जाता येणार नाही. तसेच पुढील सहा महिने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी बावधन पोलीस ठाण्यात हजेरी लावावी लागणार आहे.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार

नवीन पनवेल : १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याप्रकरणी १७ वर्षीय अल्पवयीन मुलाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चार नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. जुलै २०२६ मध्ये पीडित मुलगी तिच्या राहत्या घरी असताना आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेतून मुलगी गर्भवती राहिली. त्यानंतर ती पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेली असता हा प्रकार उघडकीस आला. आरोग्य केंद्रातून माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू करून अल्पवयीन आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला.

महाराष्ट्रासह सात राज्यांतील वगळलेल्या मतदारांना संधी

'एसआयआर'ला मुदतवाढ!

तीन दिवसांत निवडणूक आयोगाचा दुसरा निर्णय

13 कोटी नावे वगळल्याच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (एसआयआर) वाढत्या तक्रारी आणि वादाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाला पुन्हा एकदा आपल्या निर्णयात बदल करावा लागला आहे. महाराष्ट्रात यापूर्वीच अनेकदा मुदतीत वाढ केल्यानंतर आता महाराष्ट्रासह सात राज्यांतील मतदारांना आणखी एक संधी देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. अवघ्या तीन दिवसांत दुसऱ्यांदा निर्णय बदलण्याची वेळ आल्याने एसआयआर प्रक्रियेतील त्रुटी आणि आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

निवडणूक आयोगाने ६ नोव्हेंबर रोजी घेतलेल्या नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र, दिल्ली, •➤पान ५ वर

फॉर्म ६ मध्येही बदल

एसआयआर पूर्ण झालेल्या राज्यांमध्ये नव्याने नाव नोंदविण्यासाठीच्या फॉर्म ६ मधून २००३ च्या मतदार यादीचा संदर्भ देणारी अतिरिक्त घोषणा आयोगाने काढून टाकली आहे. अर्जदाराला स्वतःचे, आई-वडिलांचे किंवा आजी-आजोबांचे नाव २००३ च्या यादीत होते की नाही, याची माहिती देण्याची आवश्यकता राहणार नाही.

प्रक्रियेतील त्रुटींवर प्रश्न

एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून मोठ्या प्रमाणावर नावे वगळली गेल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. जिवंत मतदारांना मृत, तर स्थलांतरित मतदारांना अनुपस्थित दाखविल्याचेही आरोप झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ३ नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्यांना फॉर्म क्रमांक ६ द्वारे नोंदणीची संधी देण्यात आली. त्यानंतर ६ नोव्हेंबरला अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झालेल्या मतदारांना पुन्हा गणना अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आली. वारंवार मुदतवाढ आणि नव्याने संधी देण्याच्या निर्णयांमुळे आयोगाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, हे मोठे आव्हान आहे.

घरात घुसून दोन तरुणींवर गोळीबार



। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

- **कोपरखैरणेत दिवाळीच्या सणासुदीत थरार**
- **एक संशयित पोलिसांच्या ताब्यात, दुसरा फरार**

दिवाळीच्या सणासुदीत कोपरखैरणे गोळीबाराच्या थराराने हादरले. सेक्टर १ मधील एका घरात घुसून दोन तरुणींवर बेछूट गोळीबार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात एकीच्या कानाजवळून गोळी गेली, तर दुसरीच्या पाठीत गोळी घुसल्याने दोघीही गंभीर जखमी झाल्या आहेत. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत अर्जुन चव्हाण (२२) याला ताब्यात घेतले आहे. तर त्याचा साथीदार राकेश चव्हाण फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कोपरखैरणे सेक्टर १ मधील एका घरात हा गोळीबार झाला. हल्लेखोरांनी घरात घुसून दोन्ही तरुणींना लक्ष्य केले. यामध्ये एका तरुणीच्या •➤पान ५ वर

१२ फेब्रुवारीलाच विलीनीकरण होणार होते

। मुंबई । प्रतिनिधी



- **दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून दावा**
- **तटकरे, शशिकांत शिंदेंच्या विधानांनी राज्यात खळबळ**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा निर्णय १२ फेब्रुवारीलाच होणार होता, असा दावा दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अजित पवार हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या असत्या, असे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले, तर शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही १२ फेब्रुवारीला विलीनीकरण होणार होते, या दाव्याला दुजोरा दिला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाच्या चर्चांमुळे सत्ताधाऱ्यांना धडकी भरली असून, राजकीय वातावरणात खळबळ उडाली आहे.

सुनील तटकरे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत चर्चा झाली होती. विलीनीकरणाची रूपरेषाही निश्चित झाली होती. अजितदादांची त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती होती. १२ फेब्रुवारीला विलीनीकरण होणार होते. मात्र, २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाल्याने ही प्रक्रिया पुढे जाऊ शकली नाही.

दरम्यान, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही तटकरे यांच्या विधानाला दुजोरा दिला आहे. १२ फेब्रुवारीला विलीनीकरण होणार होते, मात्र महानगरपालिका निवडणुकांमुळे हा निर्णय लांबला होता, असे त्यांनी सांगितले. अजितदादांची बारामती येथे बैठक झाली होती. त्याआधी जयंत पाटील यांच्या निवासस्थानीही बैठक झाली होती. याच बैठकांमध्ये विलीनीकरणाचा निर्णय झाला होता, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. अजितदादा असते तर जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका तसेच पदवीधर आणि शिक्षक •➤पान ५ वर

शेकाप नेत्यांनी घेतली शरद पवारांची भेट

- **जयंत पाटील, चित्रलेखा पाटील यांच्याकडून प्रकृतीची विचारपूस**
- **लवकर बरे होण्यासाठी व्यक्त केल्या सदिच्छा**

। मुंबई । प्रतिनिधी ।



महाराष्ट्राच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनी रुग्णालयात भेट घेतली. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील आणि राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी गुरुवारी (दि. ५) शरद पवार यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी केली. तसेच त्यांना लवकरात लवकर उत्तम आरोग्य लाभावे आणि त्यांनी पुन्हा सक्रियपणे सार्वजनिक •➤पान ५ वर

> शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील ज्येष्ठ, अनुभवी आणि मार्गदर्शक नेतृत्व आहे. अनेक दशकांपासून त्यांनी राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा महाराष्ट्राला नेहमीच लाभ झाला आहे. त्यांची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी, त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, हीच मनापासून सदिच्छा आहे. त्यांनी पुन्हा एकदा त्याच उत्साहाने सार्वजनिक जीवनात सक्रिय व्हावे आणि त्यांचे मार्गदर्शन आम्हा सर्वांना लाभत राहावे, हीच सदिच्छा आहे. – जयंत पाटील, सरचिटणीस, शेकाप

जंगलतोडीला हरित लवादात आव्हान

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील टोरेंट कंपनीच्या साईडोंगर-१ जलविद्युत प्रकल्पासाठी होणाऱ्या जंगलतोडीचा वाद आता राष्ट्रीय हरित लवादापर्यंत पोहोचला आहे. २३३ हेक्टर वनक्षेत्र वळते करणे आणि ३२ हजार ४९० झाडे तोडण्याच्या परवानगीला आव्हान देणाऱ्या याचिकेची दखल घेत राष्ट्रीय हरित लवादाच्या पुणे येथील पश्चिम विभागीय खंडपीठाने सरकारला नोटीस बजावली आहे.

ॲड. सागर के. देवरे यांनी दाखल केलेल्या अपिलावर ॲड. मैत्रेय घोरपडे यांनी युक्तिवाद केला. वनसंवर्धन कायदा, वनहक्क कायदा, ग्रामसभांचे विरोधी ठराव, वन्यजीव संरक्षण आणि पश्चिम घाटाच्या पर्यावरणीय संवेदनशीलतेसंदर्भातील मुद्दे याचिकेत उपस्थित करण्यात आले आहेत. महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरूसह अनुसूची-१ मधील वन्यजीवांच्या अधिवासावर आणि जंगलाच्या सलगतेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांकडेही न्यायाधिकरणाचे लक्ष वेधण्यात आले आहे. संबंधित वन व पर्यावरणीय मंजुरींची कायदेशीर वैधता तपासून वनक्षेत्राचे संरक्षण करावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. त्यामुळे टोरेंट प्रकल्पातील जंगलतोडीचा प्रश्न आता न्यायालयीन तपासणीच्या कक्षेत आला आहे.

वृक्षतोडीविरोधात आदिवासी आक्रमक



। नेरळ । प्रतिनिधी ।

- **'सह्याद्री वाचवा, आदिवासी वाचवा'चा एल्गार**
- **कर्जत प्रांत कार्यालयावर धडक, टोरेंट हटावचा नारा**

सह्याद्रीच्या जंगलांवर कुऱ्हाड चालवून आदिवासींचे अस्तित्वच मिटवण्याचा डाव खपवून घेणार नाही, असा इशारा देत आदिवासी समाज टोरेंट कंपनीविरोधात आक्रमक झाला आहे. साईडोंगर जलविद्युत प्रकल्पासाठी सुरू असलेल्या वृक्षतोडीच्या निषेधार्थ रायगड जिल्ह्यातील विविध आदिवासी संघटना एकवटल्या असून, कर्जत तालुका आदिवासी समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली कर्जत ते प्रांत कार्यालय असा शुक्रवारी दि. ६ मोर्चा काढण्यात आला. यावेळी 'सह्याद्री वाचवा, आदिवासी वाचवा', 'जल, जंगल, जमीन आमच्या हक्काची' आणि 'टोरेंट हटाव' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

टोरेंट कंपनीच्या साईडोंगर जलविद्युत प्रकल्पासाठी २० ऑक्टोबरपासून वृक्षतोड •➤पान ५ वर

मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टला स्वपक्षातूनच प्रखर विरोध

शिलार धरण प्रकल्प रद्द करण्यासाठी थोपटले दंड

। नेरळ । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना आता स्वपक्षातूनच विरोधाचा सामना करावा लागत आहे. कर्जत तालुक्यातील शिलार धरण आणि टोरेंटच्या ऊर्जा प्रकल्पामुळे सह्याद्रीच्या पर्यावरणाचा ऱ्हास होणार असल्याचा आरोप करत भाजपचे कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ यांनी थेट मुख्यमंत्र्यांनाच पत्र लिहून शिलार धरण प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे. पक्षापेक्षा आधी मी या मातीचा पुत्र आहे, अशी ठाम भूमिका घेत रसाळ यांनी मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टविरोधात दंड थोपटल्याने स्थानिक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला नवे बळ मिळाले आहे.

भाजपचे कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ •➤पान ५ वर



दिवाळीपूर्वी पगार देण्याची घोषणा | उर्वरित १० टक्क्यांबाबत संभ्रम

९० टक्के वेतनावर एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिवाळी गोड करण्यासाठी दिवाळीपूर्वी वेतन देण्याची घोषणा करणाऱ्या एसटी महामंडळाने कर्मचाऱ्यांच्या आनंदावर विरजण घातले आहे. नोव्हेंबरचे वेतन दिवाळीपूर्वी खात्यात जमा झाले खरे; मात्र पूर्ण वेतनाऐवजी केवळ ९० टक्केच रक्कम मिळाल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. उर्वरित १० टक्के वेतन कधी मिळणार, असा सवाल कर्मचारी उपस्थित करत आहेत.

महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या रायगड विभागांतर्गत १९ बसस्थानके असून, जिल्ह्यात अडीच हजारांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये चालक, वाहक, मेकॅनिक आणि अन्य विभागांतील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. साधारणपणे दर महिन्याच्या सात तारखेला वेतन जमा होते. मात्र, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महामंडळाने यंदा नोव्हेंबरचे वेतन सणापूर्वी देण्याचा निर्णय घेतला.

रजा, इतर बाबी तपासून उर्वरित वेतन

एसटी कर्मचाऱ्यांना नोव्हेंबरचे वेतन दिवाळीपूर्वी देण्यात आले आहे. रजा आणि इतर बाबींचा विचार करून सध्या पूर्ण वेतन देण्यात आलेले नाही. संबंधित बाबींची तपासणी करून उर्वरित वेतन दिले जाईल, अशी माहिती रायगड विभागाचे आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी दिली.



त्यानुसार दिवाळीच्या चार दिवस आधी कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा झाले. त्यामुळे सुरुवातीला कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, प्रत्यक्षात १०० टक्क्यांऐवजी ९० टक्केच वेतन मिळाल्याने हा आनंद अल्पकाळ टिकला.

तुटपुंज्या वेतनावर काम करणारे चालक, वाहक, मेकॅनिक आणि अन्य कर्मचारी वेळेचे बंधन न पाळता सेवा बजावत असतात. अशा परिस्थितीत पूर्ण वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. उर्वरित दहा टक्के वेतन कधी मिळणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दिवाळीच्या सणात घरखर्च, किराणा, कपडे आणि इतर खरेदीचे नियोजन करताना कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतनाची अपेक्षा होती. मात्र, वेतनातील दहा टक्के रक्कम रोखून धरल्याने अनेकांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे. सणासुदीच्या काळात जाहीर केलेल्या वेतनाचा पूर्ण लाभ मिळण्याऐवजी कपात सहन करावी लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. त्यामुळे उर्वरित वेतन विनाविलंब जमा करावे, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

अलिबागच्या डॉ. विनायक पाटीलांकडे राज्याची धुरा



महाराष्ट्र स्टेट इंडियन अॅकडमी ऑफ पेडियाट्रिक्सच्या अध्यक्षपदाची जबाबदारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरलेल्या कामगिरीत बालरोगतज्ज्ञ डॉ. विनायक पाटील यांनी राज्यस्तरावर मानाचा ठसा उमटवला आहे. महाराष्ट्रातील आठ हजारांहून अधिक बालरोगतज्ज्ञांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र स्टेट इंडियन अॅकडमी ऑफ पेडियाट्रिक्स या प्रतिष्ठित संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सोलापूर येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांची एक वर्षाच्या कालावधीसाठी निवड करण्यात आली.

बालआरोग्य, लसीकरण, कुपोषण, संसर्गजन्य आजार आणि बालमृत्यूचे प्रमाण •➤पान ५ वर

'जलसा'ला बॉम्बने उडवण्याची धमकी

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईत बॉम्बधमक्यांचे सत्र सुरूच असून, आता थेट ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या जुहू येथील 'जलसा' बंगल्याला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाला प्राप्त झालेल्या धमकीच्या ई-मेलमध्ये न्यायालयासह मुंबई शेअर बाजार (बीएसई), वरळी रेसकोर्स आणि अमिताभ बच्चन यांच्या बंगल्याला लक्ष्य करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या धमकीने मुंबईत खळबळ उडाली असून, पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाला हा धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. त्यामध्ये शहरातील महत्त्वाच्या •➤पान ५ वर

बेशरमपणाचा कळस

ऐन दिवाळीत कोणाविषयी वाईट शब्द बोलण्याची खरे तर इच्छा नाही. पण फडणवीस सरकारने लाज, लज्जा, शरम यांच्या सर्व हद्दी पार करण्याचे ठरवले असल्याने नाईलाज आहे. कोल्हापूरच्या गोकुळ जिल्हा दूध उत्पादक संघ ताब्यात घेण्यासाठी सरकारने जो काही खेळ चालवला आहे तो सर्व लोकशाही संकेत, मानमर्यादा गुंडाळून ठेवणारा आहे. महाराष्ट्रातील सहकारामध्ये राजकारण पूर्वापार होत आले आहे. गोष्टी अगदी हाणामाऱ्यांपर्यंत गेल्याची उदाहरणे आहेत. राज्य सरकारातल्या मंत्र्यांनी या निवडणुकांच्या धुळवडी केल्याचेही प्रकार घडलेले आहेत. पण गोकुळच्या निमित्ताने जे चालू आहे ते केवळ एक किंवा दोन नेत्यांची आपसातली सत्तास्पर्धा यापुरते मर्यादित नाही. हा संघ कबजात करण्यासाठी सत्ताधारी महायुतीने व राज्य सरकारने तमाम ताकद पणाला लावली आहे. आणि निवडणुकीत हरल्यानंतर तर सरकारची ही दांडगाई अधिकच वाढली आहे. असे पूर्वी कधी झाल्याचे आठवत नाही. एरवी राज्याच्या निवडणुकीत एकमेकांचे विरोधक असणारे नेते सहकारात एकाच पॅनेलमध्ये असण्याचे प्रकार नेहमी होतात. कोल्हापूरमध्येही वारंवार या युत्या व मैत्र्या बदललेल्या आहेत. कधी महादेव महाडिक यांच्यासोबत असलेले लोक नंतर त्यांचे वर्चस्व संपवण्यासाठी एकत्र आलेले दिसले आहे. यंदा मात्र सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या विरोधात महायुतीचे नेते एकवटले. कोल्हापुरात बंटी पाटील व सांगलीत विश्वजित कदम आणि वसंतदादांचे वारसदार विशाल पाटील इत्यादींनी अजूनही काँग्रेसचा झेंडा शाबूत ठेवला आहे. भाजपला तोच खटकत आहे. त्यासाठी यंदा गोकुळच्या निवडणुकीचे निमित्त केले गेले. महायुतीच्या उमेदवारांच्या निवडीपासून प्रचाराच्या रणनीतीपर्यंत सर्वत्र देवेंद्र फडणवीसांनी लक्ष घातले. नंतर हसन मुश्रीफ यांनी मतदारांना देवीच्या आणि काही संतपुरुषांच्या शपथा घातल्या. तरीही महायुती हरली. मुश्रीफांचे चिरंजीव नविद आणि भाजपचे आमदार अमल महाडिक यांच्या पत्नी शौमिका महाडिक इत्यादी बिनीचे नेते हरले. २५ जागांच्या निवडणुकीत बंटी पाटलांचे १३ आणि महायुतीचे १२ जण संचालक निवडून आले. केवळ एका जागेने का होईना बंटी पाटील यांच्या समविचारी गटाला बहुमत मिळाले.

कायदा दुरुस्तीचा खेळ

हा कौल स्वीकारून सर्वसंमतीने संस्था चालवली जाईल असे वाटत होते. पण २९ ऑक्टोबरच्या संचालक मंडळाच्या बैठकीला विरोधी गटाचे बारा जण गैरहजर राहिले. त्यामुळे गोकुळ संघाच्या चेअरमनची निवड होऊ शकली नाही. कारण, अशा बैठकीला किमान १४ संचालक हजर असल्याखेरीज कामकाज करता येत नाही असा गोकुळ दूध संघाचा नियम आहे. विरोधी गटाने मुद्दाम गैरहजर राहून मुद्दाम कोरम पूर्ण केला नाही असा दावा करून सतेज यांनी न्यायालयात धाव घेतली. त्यावर न्यायालयाने १० नोव्हेंबरला पुन्हा बैठक घेण्याचे आदेश दिले. इतके झाल्यानंतर महायुतीने माघार घ्यायला हवी होती. पण छापा पडला तरी माझा आणि काटाही माझाच असे या सरकारचे धोरण आहे. निवडणुकीत जिंकलो तर सत्ता माझी आणि हरलो तरीही सत्ता माझीच हे भाजपचे धोरण आहे. याच धोरणाला अनुसरून अत्यंत घाईघाईने कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. वार्षिक ५०० कोटी रुपयांहून अधिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या समित्यांवर राज्य सरकारतर्फे पाच संचालकांची नियुक्ती करण्याचा नवा नियम जारी करण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाने याला मंजुरी दिली आणि लगोलग तो राज्यपालांकडे पाठवण्यात आला. या पाच संचालकांमध्ये एक सहायक निबंधक दर्जाचा अधिकारी आणि चार अशासकीय व्यक्तींना नेमले जाणार आहे. विशेष म्हणजे या चार जणांना मतदानाचा अधिकार असेल. हे चार जण अर्थातच महायुतीच्या गटाच्या बाजूने मतदान करण्यासाठीच तिथे नियुक्त असतील. त्यांच्या मतांच्या आधारे गोकुळचे चेअरमनपद व बाकीचे कारभारी मंडळ स्वतःच्या ताब्यात घेण्याचा हा अत्यंत घाणेरडा प्रयत्न आहे. गोकुळमधील कोरमचा तिढा सोडवण्यासाठीच हा नियम करण्यात आला असे हसन मुश्रीफ यांनी वार्ताहरांना सांगितले. पण मुळात कोरम पूर्ण न होण्याला महायुतीचे खालच्या पातळीवरचे डावपेच जबाबदार आहेत हे जणू लोकांना कळतच नाही असे मुश्रीफांना वाटत असावे. जनतेला मूर्ख, लाचार समजण्याचे जे एक नवे राजकारण भाजपने रूढ केले आहे त्याचा कळस गोकुळमध्ये गाठला जात आहे.

सहकार संपवण्याचे कारस्थान

ज्या सहकारी संस्थांना सरकार मदत करीत असते त्यांच्यावर संचालक नियुक्त करण्याचा सरकारला अधिकार असतो असेही मुश्रीफ म्हणाले. काही प्रमाणात ते खरे आहे. पण असे संचालक हे कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी वा सल्ला देण्यासाठी असतात. त्यांना मतदानाचा अधिकार नसतो. दुसरे म्हणजे सरकार मदत करते हाच न्याय लावायचा असेल तर अदानी, अंबानीसारख्या कंपन्यांवरही सरकारने आपले संचालक नियुक्त करायला हवेत. ही हिंमत ते दाखवू शकेल काय याचे उत्तर फडणवीसांनी द्यायला हवे. याच स्तंभात पूर्वी म्हटल्याप्रमाणे गोकुळ दूध संघ किंवा अशाच काही सहकारी संस्था या महाराष्ट्राची शान आहेत. पण भाजपला त्या चालू द्यायच्या नाहीत. यात दुहेरी डाव आहे. या संस्थांमधून काँग्रेस व विरोधकांना जो आधार मिळतो तो त्यांना खतम करायचा आहे. शिवाय, या संस्था अमूलसारख्या गुजराती बड्या संस्थेच्या घशात घालायच्या आहेत. अमूलला हिंदी पट्ट्यातील राज्ये मोकळी मिळाली. पण महाराष्ट्रातील गोकुळ, वारणा, कृष्णा किंवा कर्नाटकातील नंदिनी या संघांशी मोठी स्पर्धा करावी लागली व अजूनही लागत आहे. ही स्पर्धा सरकारच्या मदतीने संपवण्याचा हा प्रयत्न आहे. मुंबईत एकेकाळी महानंद हा राज्यभरातील दूध संस्थांच्या महासंघाचे दूध व इतर उत्पादने चांगली खपत होती. पण आमच्या सहकारी संस्थांच्या कर्मदरिद्रीपणामुळे मुंबईचे मार्केट अमूलला बहाल केले गेले. आता अमूलला मुंबईच्या पलिकडे महाराष्ट्रात घुसायचे आहे. स्थानिक मोठ्या संस्थांना नष्ट करून अमूलचा ब्रँड वाढवायचा आहे. हे सध्याच्या राजकारण्यांच्या फायद्याचे आहे. दुर्दैवाने फडणवीस हे महाराष्ट्राचे कमी व भाजपच्या गुजराती हितसंबंधांचे अधिक रक्षण करतात की अशीच स्थिती आहे. तसे नसते तर गोकुळ ताब्यात घेण्यासाठी इतका आटापिटा केला गेला नसता. फडणवीसांच्या भाजपने शिवसेना फोडली व महाराष्ट्राचे राजकारण नासवून टाकले. नंतर संशयास्पद रीतीने का होईना पण भाजपला विधानसभेत विक्रमी विजय मिळाला. पण भाजपची हवस संपलेली नाही. त्यांना कुठेही नावालाही विरोधक शिल्लक ठेवायचा नाही. शिवाय अर्थव्यवहारही अदानी आणि अशाच काही ठराविक लोकांच्या ताब्यात द्यायचे आहेत. पण कोल्हापुरात बंटी पाटील आणि त्यांचे सहकारी हे सहजासहजी होऊ देणार नाहीत. सोमवारी पाटील यांनी कोल्हापूरकरांच्या महामोर्चाचे आवाहन केले आहे. संचालक मंडळावर सरकारने नियुक्त्या करण्याचे चाळे हा फक्त गोकुळचा प्रश्न नसून कोल्हापूरकरांचा अपमान आहे असे बंटी पाटील यांचे म्हणणे आहे व कोल्हापूरकर ते उचलून धरतील यात अजिबात शंका नाही. पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे आज हा नियम ५०० कोटींच्या वरच्या संस्थांना लागू आहे. उद्या नियमात बदल करून तो सर्व सहकारी संस्था आणि त्याही पुढे जाऊन बँकांनाही लागू केला जाऊ शकेल. ही मनमानी वेळीच रोखण्याची गरज आहे.

विचार

पतधोरण आणि 'अल निनो'चे पडसाद

रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पतधोरणाचे परिणाम दिसू लागले आहेत. आता कर्जाचे व्याजदर वाढण्याची शक्यता बोलून दाखवली जात आहे. याच सुमारास 'अल-निनो' मुळे सामान्यजनांच्या कर्जफेडीच्या क्षमतेवर कसा परिणाम होत आहे, हे समोर आले. दरम्यान, भारतीय 'आयटी' कंपन्यांना चीनमध्ये थेट कंत्राटे मिळण्यातील गतिरोधक पहायला मिळाले. सणासुदीच्या काळात कांद्याचे भाव नियंत्रणात येणार का, या प्रश्नाची चर्चाही रंगली.

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये रिझर्व्ह बँकेच्या ताज्या पतधोरणाने सामान्यांच्या तोंडचे पाणी पळवले. त्याचे परिणाम आता पहायला मिळत आहेत. आता कर्जाचे व्याजदर वाढण्याची शक्यता बोलून दाखवली जात आहे. याच सुमारास 'अल-निनो'मुळे सामान्यजनांच्या कर्जफेडीच्या क्षमतेवर कसा परिणाम होत आहे, हे समोर आले. दरम्यान, भारतीय 'आयटी' कंपन्यांना चीनमध्ये थेट कंत्राटे मिळण्यातील गतिरोधक पहायला मिळाले. सणासुदीच्या काळात कांद्याचे भाव नियंत्रणात येणार का, या प्रश्नाची चर्चाही रंगली.

'गोल्डमन सॅक्स'चे भारतातील मुख्य अर्थतज्ज्ञ शांतनू सेनगुप्ता यांनी रिझर्व्ह बँक आगामी काळात व्याजदरात आणखी वाढ करू शकते, असा अंदाज व्यक्त केला आहे. त्यांच्या मते, व्याजदरात एकूण ७५ बेसिस पॉइंट्सपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्याच वेळी भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी व्याजदर वाढवण्याची वेळ आली, तरी देशाच्या आर्थिक विकासाचा वेग टिकून राहू शकतो. रिझर्व्ह बँकेनेही चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीनंतर आगामी काळात व्याजदर कपातीची शक्यता कमी असल्याचे संकेत दिले होते. सेनगुप्ता यांच्या मते, आगामी काळात व्याजदरात आणखी ७५ बेसिस पॉइंट्सपर्यंत वाढ होऊ शकते. त्यांनी 'अल निनो'चा संभाव्य परिणाम आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींबाबतही चिंता व्यक्त केली आहे. सेनगुप्ता यांच्या अंदाजानुसार, रिझर्व्ह बँक डिसेंबरमध्ये व्याजदरात एकदा वाढ करू शकते. त्यानंतर पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये आणि त्यानंतर एप्रिल किंवा जूनमध्ये आणखी एकदा दरवाढ होण्याची शक्यता आहे. या संभाव्य बदलांमुळे व्याजदरात एकूण ७५ बेसिस पॉइंट्सपर्यंत वाढ होऊ शकते; मात्र ही गोल्डमन सॅक्सच्या अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलेली शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेने भविष्यातील व्याजदरवाढीबाबत असा निश्चित कार्यक्रम जाहीर केलेला नाही.

सेनगुप्ता यांनी असेही म्हटले आहे, की व्याजदरात आणखी कडक धोरणात्मक बदल झाले, तरी भारताचा आर्थिक विकासदर सुमारे सात टक्के राहू शकतो. 'अल निनो'च्या संभाव्य परिणामांबाबतही सेनगुप्ता यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, उन्हाळी हंगामातील पिकांवर अल निनोचा परिणाम तुलनेने कमी असू शकतो; मात्र काही राज्यांमध्ये 'अल निनो'शी संबंधित हवामान परिस्थितीमुळे अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला. त्याचा शेती उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. 'अल निनो'मुळे पावसाच्या वितरणात बदल होऊ शकतो. त्याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर झाल्यास बाजारात काही कृषी वस्तूंचा पुरवठा कमी होऊ शकतो. पुरवठा कमी झाला आणि मागणी कायम राहिली, तर खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे महागाईवर नियंत्रण ठेवणे रिझर्व्ह बँकेसाठी अधिक आव्हानात्मक ठरू शकते. सेनगुप्ता यांच्या मते, 'अल निनो'च्या परिणामांचे बाजाराने अद्याप पूर्णपणे मूल्यमापन केलेले नाही. त्यामुळे हा पुढील काळातील संभाव्य धोका ठरू शकतो. विशेषतः रब्बी हंगामातील पिकांवर त्याचा किती परिणाम होतो, याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कमकुवत मॉन्सूनमुळे भारतातील ३.३० लाख कोटी रुपयांच्या सूक्ष्म वित्त क्षेत्रासमोर नवी चिंता निर्माण झाली आहे. सप्टेंबरअखेर देशात सरासरीच्या तुलनेत १२.६ टक्के कमी पाऊस झाला. कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थान या राज्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम छोट्या कर्जदारांच्या हप्ते फेडण्याच्या क्षमतेवर होऊ शकतो.

सूक्ष्म वित्त कंपन्या प्रामुख्याने अशा ग्राहकांना छोटी कर्जे देतात. त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग शेती किंवा ग्रामीण आर्थिक व्यवहारांवर अवलंबून असतो. पावसाच्या कमतरतेमुळे या कुटुंबांच्या कमाईवर परिणाम झाला, तर त्यांना वेळेवर कर्जाचे हप्ते भरणे कठीण होऊ शकते. त्यामुळे सूक्ष्म वित्त कंपन्यांसमोर कर्जवसुलीची आव्हाने वाढण्याची शक्यता आहे. 'क्रेडिटॲक्सेस'ग्राम िणचे व्यवस्थापकीय संचालक गणेश नारायणन यांनी सांगितले, की कंपनी दुष्काळसदृश परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. प्रभावित जिल्ह्यांम ध्ये कर्जवाटप करताना सावधगिरी बाळगली जात आहे; मात्र ग्राहकांना आवश्यक मदत देण्याचे काम सुरूच आहे. त्यांच्या मते, आतापर्यंत या परिस्थितीचा परिणाम मर्यादित राहिला आहे. यामागील एक कारण म्हणजे शेतीवर अवलंबून असलेल्या ग्राहकांमधील कंपनीची जोखीम मर्यादित आहे. याशिवाय, अनेक कर्जदारांच्या उत्पन्नाचे स्रोत वेगवेगळे असल्याने त्यांचा पैशांचा प्रवाह कायम राहण्यास मदत होते; मात्र सर्व सूक्ष्म वित्त कंपन्यांसाठी परिस्थिती सारखी असेलच असे नाही. 'एस अँड पी ग्लोबल'च्या वित्तीय संस्था मानांकन विभागाच्या संचालक निकिता आनंद यांच्या मते, सूक्ष्म वित्त क्षेत्रातील छोट्या कर्जदारांच्या उत्पन्नाचा शेतीशी अधिक जवळचा संबंध असतो. त्यामुळे कमी पाऊस आणि दुष्काळाचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर अधिक होऊ शकतो. या क्षेत्रासमोरील एक म हत्त्वाची चिंता म्हणजे कर्ज आणि विमा यांच्यातील अंतर. सर्वसाधारणपणे शेतकऱ्यांना दिली जाणारी कृषी कर्जे प्रधानमंत्री पीकविमा योजनेशी संबंधित असू शकतात. त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास पात्र शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळू शकतो. याउलट, ग्रामीण भागातील सूक्ष्म वित्त कर्जे सामान्यतः पीक विम्याच्या संरक्षणाखाली येत नाहीत. त्यामुळे पावसाच्या कमतरतेमुळे उत्पन्न घटल्यास कर्जदार आणि त्यांना कर्ज देणाऱ्या कंपन्या या दोघांसाठीही आर्थिक जोखीम वाढू शकते. दरम्यान, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय देशभरातील महामार्गांवरील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाकांक्षी योजनेवर काम करत आहे. या योजनेंतर्गत दर ३० किलोमीटर अंतरावर अत्याधुनिक कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. रस्ते अपघातांना आळा घालणे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे हा या योजनेमागील उद्देश आहे. मंत्रालयाच्या योजनेनुसार, देशातील प्रमुख राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर प्रगत वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (ॲडव्हान्स्ड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम-एटीएम एस) उभारण्यात येणार आहे. महामार्गांवरील सुरक्षा आणि देखरेख अधिक प्रभावी करण्यासाठी दर ३० किलोमीटरच्या अंतरात अत्याधुनिक कॅमेरे बसवले जातील. या कॅमेऱ्यांमध्ये वाहनांच्या क्रम ांकपट्ट्या ओळखणारे एएनपीआर (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन) तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जाणार आहे. 'एआय' आधारित 'व्हिडीओ इन्सिडेंट डिटेक्शन' प्रणालीच्या मदतीने महामार्गांवरील अपघात किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती तातडीने ओळखता येईल. त्यामुळे मदत आणि बचावकार्य सुरू करण्यासाठी लागणारा वेळ कमी होण्यास मदत होईल.

मोठ्या खर्चाच्या या प्रकल्पासाठी निधी उभारणीच्या पद्धतीवर सध्या विचारविनिमय सुरू आहे. योजनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात राज्यांच्या मुख्यालयांमध्ये स्वतंत्र नियंत्रण कक्ष उभारले जाणार आहेत. या नियंत्रण कक्षांमध्ये भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आणि राज्य सरकारच्या संबंधित यंत्रणांमधील अधिकाऱ्यांची संयुक्त नियुक्ती केली जाईल. त्यामुळे तक्रारी आणि नियमभंगाच्या प्रकरणांवर कारवाई करताना होणारा विलंब टाळता येईल. संबंधित प्रकरण केंद्राच्या किंवा राज्याच्या अखत्यारीत येत असल्यास त्यानुसार तातडीने कारवाई करणे शक्य होईल. राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर रस्त्याच्या कडेला उभे असलेले बेवारस किंवा नादुरुस्त ट्रक अनेकदा गंभीर अपघातांना कारणीभूत ठरतात. अशा घटनांना आळा घालण्यासाठी मंत्रालय कठोर उपाययोजना करत आहे. महामार्गांवर चुकीच्या पद्धतीने वाहने उभी करणाऱ्यांवर तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर स्वयंचलित पद्धतीने दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

याशिवाय, राष्ट्रीय महामार्ग किंवा द्रुतगती मार्गांलगत अनधिकृत प्रवेशमार्ग तयार करणाऱ्या हॉटेल्स आणि ढाब्यांवरही कारवाई करण्याची योजना आहे. अशा अनधिकृत प्रवेशमार्गांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होण्याबरोबरच अपघातांचा धोकाही वाढतो. या संदर्भात राज्य सरकारांशी चर्चा सुरू आहे. कारण प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कारवाईचे अधिकार संबंधित राज्यांच्या अखत्यारीत येतात.

चर्चा आजची

किल्ले उभारणीतून इतिहासाचा जागर



मोबाईल, टिव्ही विसरून मुले कोणता किल्ला बनवायचा, त्याची रचना कशी असावी, दरवाजा कुठे असावा, बुरुज कुठे उभारावेत, पाण्याची टाकी कुठे दाखवायची, या सगळ्याचा विचार करताना दिसून येतात. यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. माती, दगड, पुठ्ठे, रंग आणि टाकाऊ वस्तू वापरून ते आपल्या मनातल्या किल्ल्याला मूर्त रूप देतात. ही प्रक्रिया त्यांच्यातील कलागुणांना वाव देते.

अंतरा पारंगे

प्रत्येकाच्या घरात दिवाळी सणाचा उत्साह साजरा केला जात आहे. दिवाळी म्हटली की, काहींना नवीन वाहन, कपडे खरेदीचे तर गृहिणींना फराळ बनविण्याचे वेध लागतात. मात्र लहान मुलांना वेध लागतात ते किल्ला उभारण्याचे. सहामाही परीक्षेनंतर सुट्टी पडताच लहान मुलांची किल्ले उभारणीची लगबग सुरु होते.

आजच्या डिजिटल युगात, मुले मोबाईल आणि व्हिडिओ गेम्समध्ये रमलेली असतात. मात्र, दिवाळीचा सण जवळ येताच मुलांमध्ये किल्ला उभारणीचा उत्साह संचारलेला दिसून येतो. किल्ला कोणता, कसा आणि किती मोठा बनवायचा याविषयी मुलांमध्ये चर्चा सुरू होते. हा उत्साह केवळ ग्रामीण भागांमधील मुलांमध्येच नाही तर शहरांमधील मुलांमध्य दिसून येतो.

किल्ला बनवण्याची परंपरा त्यांना आपल्या गौरवशाली इतिहासाशी जोडते. किल्ला बनवताना घरातील वडीलधारी मंडळी मुलांना शिवाजी महाराजांच्या गोष्टी सांगतात. प्रत्येक गडाचा इतिहास, मावळ्यांचे पराक्रम आणि गनिमी काव्याच्या लढायांबद्दल माहिती देतात. यामुळे मुलांमध्ये लहानपणापासूनच आपल्या इतिहासाबद्दल आणि राष्ट्रपुरुषांबद्दल आदर आणि अभिमान निर्माण होतो. त्यामुळे किल्ला उभारणीच्या या परंपरेतून इतिहासाचा एक प्रकारे जागर केला जातो.

महाराष्ट्राची भूमी ही वीरांची, शूरवीरांची भूमी आहे. येथील कडेकपारीत, डोंगरदऱ्यात उभे असलेले गड-किल्ले हे केवळ दगड-विटांचे बांधकाम नाहीत, तर ते मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे, त्यांच्या शौर्याचे आणि अदम्य साहसाचे मूक साक्षीदार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची, स्वराज्याच्या इतिहासाची आणि गड-किल्ल्यांच्या वैभवाची ओळख करून देणारी ही परंपरा अनेक पिढ्यांपासून जपली जात आहे. घराच्या अंगणात किंवा सोसायटीच्या आवारात मातीचा ढिगारा रचून त्यावर बुरुज, तटबंदी, दरवाजे आणि मावळ्यांच्या प्रतिकृती उभारणारी चिमुकली मंडळी दिवाळीत जणू इतिहासच जिवंत करतात.

टाकाऊ वस्तुचा वापर योग्य पद्धतीने करुन मुले किल्ल्यावर सुबकता आणण्यासाठी प्रयत्न करतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुलं जेव्हा किल्ला तयार करतात तेव्हा त्यांना त्या किल्ल्याची ऐतिहासिक, भौगोलिक आणि बांधकामशास्त्रांची ओळख प्राप्त होते. अनेक मुलं एकत्र येऊन किल्ला तयार करतात. त्यामुळे त्यांना एकात्मतेचे बळ कळते आणि मुलांच्या मनामध्ये किल्ल्याप्रती आदर देखील निर्माण होतो. बहुतेक वेळा किल्ला हा एकट्याने बनवला जात नाही. गल्लीतील, सोसायटीतील किंवा घरातील सर्व मुले एकत्र येऊन किल्ला बनवतात. कोणी माती आणतं, कोणी पाणी, कोणी दगड गोळा करतं, तर कोणी सजावटीचं काम पाहतं. या सामूहिक कार्यातून मुलांमध्ये एकीची भावना, सहकार्याची वृत्ती आणि मिळून-मिसळून काम करण्याची सवय वाढीस लागते. एकी हेच बळ हा महत्त्वाचा संदेश यातून मिळतो.

सिमेंटच्या जंगलात वाढणाऱ्या आजच्या पिढीचा मातीशी संबंध जवळपास तुटला आहे. किल्ला बनवण्याच्या निमित्ताने का होईना, मुले मातीला स्पर्श करतात, तिच्यासोबत खेळतात. हे त्यांना निसर्गाशी आणि आपल्या मूळ अस्तित्वाशी जोडते. थोडक्यात सांगायचे तर, दिवाळीत किल्ला बनवणे हे केवळ एक मनोरंजनाचे साधन नाही, तर तो एक संस्कार आहे. हा आपल्या गौरवशाली इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वाभिमानाचा जागर आहे. हा किल्ला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीला, त्यांच्या शौर्याला आणि स्वराज्याच्या संकल्पनेला दिलेली जणू एक छोटीशी मानवंदनाच आहे.

किल्ल्यावर दरबार, बाजार, मंदिर, नागमोडी वळण असणारा महा दरवाजा, तबेला, इत्यादी असे वास्तू तयार केल्या जातात, त्यामुळे ते हुबेहूब खऱ्या किल्ल्यांसारखे दिसून येते. याचदरम्यान हे सगळे आज ही जर सुखरूप असते तर ते कसे दिसले असते याची काल्पनिक प्रतिकृती किल्ल्यांद्वारे तयार करण्यात येते. ही फक्त एक कल्पना आहे. परंतु, या मागची भावना आपल्या गड किल्ल्यांच्या वास्तूंचे वैभव समोर आणणे आहे. या किल्ल्यांचे जतन करणे आणि ते स्वच्छ ठेवणे हे आजच्या आणि पुढच्या पिढीची जबाबदारी आहे. त्यामुळे या दरवर्षी दिवाळीला असे सुरेख किल्ले लहान मुलं तयार करतात.

किल्ल्यांचे संरक्षण ही आपली जबाबदारी आहे हा विचार त्यांच्या रुजवला जातो. मात्र आजची परिस्थिती पाहता गडकिल्लांचे संवर्धन ऐतिहासिक वारसांचे जतन ही काळाची गरज झालेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी, उत्कृष्ट बांधकाम शास्त्र आणि मावळ्यांचा पराक्रम नवीन पिढीला समजावा, यासाठी किल्ले सुरक्षित असणे गरजेचे आहे.

लोकसंस्कृती

सप्तरंगांची उधळण करत आली तेजोमय दिवाळी!

मरगळलेल्या मनाला पुन्हा एकदा नवसंजीवनी प्राप्त करून देणारी, दुःखाच्या अंधाराचा नाश करून प्रकाशाच्या सुखाचा मार्ग दाखवणारी तेजोमय दिवाळी सप्तरंगांची उधळण करत आली आहे. दिवाळी सणाच्या पावित्र्याने व मांगल्याने सारे वातावरण भारून गेले आहे. दिवाळी म्हणजे सर्व सणांचा राजा. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा (पाडवा) आणि भाऊबीज असे एकामागोमाग येणारे दिवाळीतील शुभ दिवस म्हणजे सुखाची जणू बरसातच! खरेच दिवाळीतील सुख, समाधान आणि त्यातील परमोच्च आनंद काही औरच असतो. सर्वत्र उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण! अभ्यंगस्नान, गोडधोड फराळाची चंगळ, त्यातच दिवाळी अंकांची साहित्यिक मेजवानी, जागोजागी लागलेले आकाश कंदील, दारोदारी उजळलेल्या पणत्या, पावित्र्याने आणि मांगल्याने भारलेल्या पारंपारिक रांगोळ्या आणि रंगीबेरंगी प्रकाश दिव्यांची रोषणाई यामुळे मनाम नात चैतन्याची भावना उमटते. दिवाळीच्या या शुभ काळात भावंडांच्या प्रेमळ गाठीभेटी होतील. भाऊबीजेला बहीण भावांची जिव्हाळ्याची भेट होईल. नात्यामधील गोडवा अधिक वृद्धिंगत होईल. या मंगलसमयी दारात तेवणाऱ्या पणत्यांच्या दिव्यांसोबतच अंतर्मनातील सकारात्मकतेचा दिवा उजळण्याची, दैनंदिन जीवनातील चिंता, कटकटी आणि कटुता बाजूला सारून, मनामध्ये नवीन आशा, उत्साह आणि चैतन्य निर्माण करण्याची हीच ती सोनेरी वेळ! दिवाळीच्या पहाटेचा हा सोनेरी प्रकाश सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि अखंड आनंदाची उधळण करीत राहो हीच शुभेच्छा!

-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

विद्यार्थी दिन : शिक्षणक्रांतीची ऐतिहासिक आठवण!

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० रोजी सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला होता. राजवाडा चौकातील या शाळेत प्रवेश घेताना त्यांच्या नावाची नोंद 'भिवा' अशी करण्यात आली होती. शाळेच्या जनरल रजिस्टरमध्ये अनुक्रमांक १९१४ समोर त्यांच्या नावाची करण्यात आलेली नोंद आणि त्यासमोरील स्वाक्षरी हा आजही ऐतिहासिक ठेवा म्हणून जतन करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या शाळेत चौथीपर्यंत शिक्षण घेतले. त्यांच्या या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो.

पत्रकार अरुण जावळे यांनी २००३ पासून हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन २०१७ मध्ये महाराष्ट्र शासनाने ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामागे केवळ एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करणे हा उद्देश नसून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनातून प्रेरणा घेण्याची संधी उपलब्ध करून देणे हा व्यापक हेतू आहे.

या दिवशी राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित निबंधलेखन, वक्तृत्व, काव्यवाचन, प्रश्नमंजुषा आदी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचे विचार, शैक्षणिक प्रवास, सामाजिक संघर्ष आणि राष्ट्रउभारणीतील योगदान यांची माहिती दिली जाते. यंदा दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे अनेक शाळा-महाविद्यालये बंद असली, तरी काही ठिकाणी ऑनलाइन माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश ही केवळ एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात नव्हती, तर ती भारतीय समाजातील शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाची नांदी होती. त्या काळात अस्पृश्यतेच्या अमानुष प्रथेमुळे वंचित समाजाला शिक्षणापासून दूर ठेवले जात होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत बाबासाहेबांनी शिक्षणाची कास धरली. अनेक सामाजिक अडचणी, भेदभाव आणि अपमान सहन करून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शिक्षणामुळे माणसाला केवळ नोकरी किंवा आर्थिक स्थैर्य मिळत नाही, तर त्याच्यात विचार करण्याची क्षमता, आत्मविश्वास, विवेक आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ निर्माण होते, हा बाबासाहेबांच्या जीवनाचा संदेश आहे. ज्या भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांचा गौरव केला जातो, त्या संविधानाच्या माध्यमातून त्यांनी देशाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या महान मानवी मूल्यांचा पाया दिला. समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या या महान कार्यामागे शिक्षणाचीच ताकद होती. म्हणूनच शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून सामाजिक आणि राष्ट्रीय विकासाचेही प्रभावी माध्यम आहे. सध्याच्या

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ नोव्हेंबर

१) श्री. वसंत अनंत साळवी
अलिबाग, ७-११-१९४५

२) श्री. जयप्रकाश शांताराम वेदक
अलिबाग, ७-११-१९४१

३) श्रीम. मनोरमा रमाकांत शिंदे
अलिबाग, ७-११-१९४५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते
स्व. परेश नवीनचंद्र गाला
स्मरणार्थ, सांताक्रुझ, मुंबई

रस्त्याचे काम थांबवा!

अलिबाग : ऐन दिवाळी रस्त्याची कामे सुरू असल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न उद्भवत आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यामुळे दिवाळी सणानंतरच रस्त्याची कामे सुरू करण्याची मागणी होत आहे.

नागोठणे टपाल कार्यालयाचा पोस्टमास्तरविना कारभार

■ कर्मचाऱ्यांच्या असहकार्यामुळे ग्राहकांना माराव्या लागतात फेऱ्या

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठणे टपाल कार्यालयात सध्या पोस्टमास्तर नसल्याने विविध बाबतीत गलथान कारभार सुरू आहे. तर नागोठणे टपाल कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या असहकार्याच्या भूमिकेमुळे येथे येणाऱ्या ग्राहकांना विविध बाबतीत नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागोठणे टपाल कार्यालयाचा कारभार सुधारून चांगली सेवा देण्याची मागणी टपाल कार्यालयाचे खातेधारक, एजंट व इतर ग्राहकांकडून केली जात आहे.

नागोठणे टपाल कार्यालयात येणाऱ्या ग्राहकांना येथील कर्मचाऱ्यांकडून कशाप्रकारे असहकार्याच्या भूमिकेला सामोरे जावे लागते याचा प्रत्यक्ष अनुभव मंगळवार दि.३ नोव्हेंबर रोजी काही ग्राहकांना आला. नागोठणे टपाल कार्यालयात आपल्या पक्षकारांच्या



कायदेशीर नोटिसा रजिस्टर एडी पोस्टद्वारे पाठविण्यासाठी आलेले वकील आणि पत्रकार महेश पवार यांनी आपण कार्यालयातील संबंधित खिडकीजवळ जाऊन आपल्या नोटिसा रजिस्टर करायचे असल्याचे सांगितले. मात्र तुम्ही पहिल्या खिडकीजवळचा असे मराठी महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर पहिला खिडकीजवळ गेल्यानंतर तेथील अमराठी महिला कर्मचाऱ्यांनी, 'त्या सुपरवायझर आहेत त्यामुळे तुम्ही त्यांच्याकडून तुमचे काम करून घ्या' असे सांगितले. थोड्या वेळासाठी या दोन्ही महिला कर्मचारी रजिस्टर पोस्टाचे काम करण्यासाठी एकमेकांकडे बोटे दाखवत होत्या. यावेळी महेश पवार यांनी अलिबाग येथील टपाल कार्यालयाचे मुख्यालयात फोन लावला असता पवार यांचा आवाज ऐकून त्यांना ओळखणाऱ्या तेथील गायकवाड नावाच्या पोस्टमनने मराठी महिला कर्मचाऱ्यांना ते काम करून देण्यास सांगितले. त्यानंतर त्या मराठी महिला कर्मचाऱ्याने पवार यांचे काम करून दिले.

याच दरम्यान टपाल कार्यालयात उपस्थित असलेल्या अनेक पुरुष व महिला एजंट, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर ग्राहकांनी टपाल कार्यालयातील अनेक बाबतीत तक्रारी असल्याची माहिती महेश पवार यांना दिली. तसेच या संदर्भात आपण ग्राहकांच्या सहयांचा तक्रारी अर्ज अलिबाग येथील जिल्हा टपाल मुख्यालयाचे उपाधीक्षक यांना पाठविणार असल्याचे सांगितले.

तक्रारी अर्जानुसार ग्राहकांची कामे वेळेवर न करणे, नेट सुरळीत न चालणे, वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर इन्व्हर्टरची व्यवस्था नसणे, प्रिंटर बिघडत असतो तो वेळेवर दुरुस्त न होणे, त्याची रिबीन संपल्यावर वेळेवर बसवली जात नाही, नवीन पासबुके वेळेवर दिली जात नाही, नविन खाती वेळेवर उघडली जात नाही, पोष्टाची स्टेशनरी वेळेवर मिळत नाही, पुर्ण झालेली खाती वेळेवर बंद होत नाही, ग्राहकाचे पैसे वेळेवर मिळत नाहीत, पैसे वेळेवर ट्रान्सफर होत नाहीत, चेक बुक वेळेवर मिळत नाही, कार्यालयातील कर्मचारी वेळेवर कामावर येत नाहीत, काहीवेळा संगणक बंद असतात, पोस्टाच्या एजंटना योग्य ती सेवा दिली जात नाही, नवीन खात्याचे फॉर्म शोधून सापडत नाहीत, मयत वारसास वेळेवर पैसे मिळत नाहीत, बंद खाती व हरवलेली पासबुके लवकर मिळत नाहीत, अशा अनेक तक्रारींचा पाढाच अर्जातून वाचण्यात आला आहे. त्यामुळे नागोठणे टपाल कार्यालयातील कर्मचाऱ्यांची मनमानी कारभाराला आळा घालावा, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.

या संदर्भात अलिबाग टपाल मुख्यालयातील उपाधीक्षक राकेश मिश्रा यांच्याशी संपर्क साधला असता या प्रकरणी माहिती घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

भादाव आदिवासी वाडीवर '५२ आठवड्यांची शाळा' उपक्रम

■ विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव येथील धडपड मित्र मंडळ आणि राष्ट्रसेविका समितीच्या अरुंधती शाखेच्या संयुक्त विद्यमाने भादाव आदिवासी वाडी येथे '५२ आठवड्यांची शाळा' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. गुरुवारी (दि.५) उत्साहपूर्ण वातावरणात या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. आदिवासी वाडीवरील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे, वाचन-लेखनाची प्राथमिक कौशल्ये विकसित करणे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



आदिवासी वाडीवरील अनेक मुले नियमितपणे शाळेत जात नाहीत. त्यामुळे त्यांना लिहिता-वाचता येत नाही, तसेच शिक्षणाच्या प्रवाहाशी त्यांची नाळ जोडली जात नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ शाळेच्या चार भिंतींत शिक्षण देण्याऐवजी शिक्षणच मुलांच्या दारात घेऊन जाण्याचा सकारात्मक विचार या उपक्रमातून करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत समाजातील शिक्षणप्रेमी शिक्षक, धडपड मित्र मंडळाचे सदस्य आणि राष्ट्रसेविका समितीच्या अरुंधती शाखेतील कार्यकर्त्या दर आठवड्याला भादाव आदिवासी वाडीवर जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तब्बल ५२ आठवडे सातत्याने हा शैक्षणिक प्रवास सुरू राहणार असून विद्यार्थ्यांना वाचन, लेखन, अंकज्ञान, संस्कार, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले जाणार आहेत.

उद्घाटनप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना पाटी, पेन्सिल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच या शाळेसाठी फळाही उपलब्ध करून देण्यात आला.

नारायण पवार यांचे निधन

रसायनी : नारायण कृष्णाजी पवार यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. खालापूर तालुक्यातील विनेगाव येथील ते



रहिवासी असून मामा या नावाने ते पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. ते सर्वांच्या सुख-दुःखात सामील होत असत. अतिशय प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. अनेक तरुणांना रोजंदारी दिली. त्यांचे अंतिम विधी मंगळवार दि.१० नोव्हेंबर रोजी राहत्या घरी होणार आहेत.

निवडक



पालकांसाठी कंदील बनविण्याची स्पर्धा

चिरनेर : बी.एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे प्रकाशाचा सण असलेल्या दिवाळीचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पालकांसाठी कंदील बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत नेहा प्रशांत म्हात्रे व स्नेहल ऋषिकेश माळी (प्रथम), तेजश्री योगेश पाटील व अक्षता अनुप पाटील (द्वितीय) तर नीलम कर्ण पाटील व लंका शंकर हळकुंडे (तृतीय) क्रमांकाचे मानकरी ठरले. या दिवाळी उत्सवात विद्यार्थ्यांनी एकमेकांना मिठाई वाटून आनंद साजरा केला. यावेळी राखी बनविण्याची स्पर्धा आणि पणती सजावट स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून पालक व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच सर्जनशीलता, सहभाग आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला.

श्री साई ट्रस्टकडून व्हील चेअर भेट

नेरळ : कर्जत तालुक्यातील शैक्षणिक आणि आदिवासी भागात कार्य



करणारी नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यमातून अंत्राटवरेडी गावातील एका अपंग व्यक्तीला व्हील चेअर भेट देण्यात आली. श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या सहकार्याने एक हात मदतीचा म्हणून कर्जत तालुक्यातील अंत्राटवरेडी गावातील जेष्ठ नागरिक रमेश काशिनाथ गायकर यांना व्हील चेअर भेट देण्यात आली. रमेश गायकर हे अपंगत्वामुळे गेली दोन वर्षे घरातच होते. एक आधाराची मदत म्हणून त्यांना या कालावधीत निश्चितच व्हीलचेअरची खूप मदत होईल. यावेळी श्री साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले तसेच आत्मरामा घोडविंदे, संजय घाटे आणि गायकर कुटुंब उपस्थित होते.

जा.क्र. न्याय शाखा/२०८५/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५. मारूती मंदिराजवळ,
मु. पो. चेंढरे, अलिबाग जि. रायगड
दि. ०६/११/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग
मालमत्ता क्र. ६२५, तळमजला
मारूती मंदिराजवळ, मु. चेंढरे
पो.ता. अलिबाग, जि. रायगड
पिन कोड : ४०२ २०१
दिनांक : ६/११/२०२६

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक : ०८/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- ST. GREGORIO DAS ORTHODOX CHIRISTIAN COMMUNITY CHARITABLE TRUST, AKRULI, TAL. PANVEL, DIST. RAIGAD
P.T.R.NO-E-635

अर्जदार: १. Mr. Manoj Philip

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, अलिबाग वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम ५० अ (१) प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे की,

विश्वस्त मंडळ

विरुद्ध

कोणी नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी दिली.

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, अलिबाग

पान ३ वरुन

'एसआयआर'ला पुन्हा मुदतवाढ!

हरियाणा, आंध्र प्रदेश, झारखंड, तेलंगणा आणि नागालँड या सात राज्यांतील मतदारांना पुन्हा नोंदणीची संधी मिळणार आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार म्हणून नोंद झालेल्या आणि ज्यांचे गणना अर्ज आयोगाकडे परत आले नाहीत, अशा मतदारांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. संबंधित मतदारांना पुन्हा गणना अर्ज सादर करता येणार असून, त्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, ३ नोव्हेंबर रोजीही आयोगाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना फॉर्म क्रमांक ६ भरून पुन्हा नाव नोंदविण्याची मुभा देण्यात आली होती. दहा वर्षांपासून मतदार असलेल्या व्यक्तीलाही हा फॉर्म भरता येणार असून, त्याला खोटे प्रतिज्ञापत्र किंवा गुन्हा मानले जाणार नाही, असे आयोगाने स्पष्ट केले होते. आता अवघ्या तीन दिवसांत पुन्हा एकदा वगळलेल्या मतदारांसाठी विशेष संधी देण्यात आली आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रियेला यापूर्वीही वारंवार मुदतवाढ देण्यात आली आहे. सुरुवातीला ३० सप्टेंबरपर्यंत असलेली हरकती व दावे नोंदविण्याची मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली. त्यानंतर २६ ऑक्टोबरपर्यंत आणि पुन्हा १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता वगळलेल्या मतदारांना स्वतंत्रपणे पुन्हा संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वारंवार बदलणारे वेळापत्रक आणि नव्याने द्याव्या लागणाऱ्या संधी यामुळे संपूर्ण प्रक्रियेच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान २०२५-२६ मध्ये बिहार आणि दिल्लीसह ३० राज्यांतील प्रारूप मतदार याद्यांमधून १३ कोटींहून अधिक नावे वगळल्याचा दावा करण्यात आला आहे.

मुदतवाढीचा घटनाक्रम

३० सप्टेंबर : मूळ अंतिम मुदत., १२ ऑक्टोबर : पहिली वाढ., २६ ऑक्टोबर : दुसरी वाढ., १३ नोव्हेंबर : तिसरी वाढ., ६ नोव्हेंबर : वगळलेल्या मतदारांना नव्याने संधी.

१२ फेब्रुवारीलाच विलीनीकरण होणार होते

मतदारसंघाच्या निवडणुकांचे चित्र वेगळे दिसले असते, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवार यांची भेट घेतली होती. यावेळी १० तारखेनंतर आपण एकत्र बसू, असे शरद पवार यांनी सांगितल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांनी विलीनीकरणाबाबत केलेल्या दाव्यांमुळे आता १० तारखेनंतरच्या संभाव्य बैठकीकडे आणि राष्ट्रवादीच्या भविष्यातील राजकीय भूमिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

घरात घुसून दोन तरुणींवर गोळीबार

कानाजवळून गोळी चाटून गेली, तर दुसऱ्या तरुणीच्या पाठीत गोळी लागली. ती रक्ताच्या थारोळ्यात पडली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांच्या मदतीने दोघींनाही तातडीने नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघींवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, डॉक्टर त्यांच्यावर लक्ष ठेवून आहेत. दरम्यान, तरुणींवर घरात घुसून गोळीबार करण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हा हल्ला वैयक्तिक वादातून झाला की त्यामागे अन्य काही कारण आहे, याचा तपास कोपरखैरणे पोलीस करत आहेत. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच कोपरखैरणे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिसांनी अर्जुन चव्हाण या संशयिताला ताब्यात घेतले असून, त्याचा साथीदार राकेश चव्हाण घटनास्थळावरून फरार झाला आहे. त्याच्या शोधासाठी पोलिसांची पथके प्रयत्नशील आहेत.

शेकाप नेत्यांनी घेतली पवारांची भेट

जीवनात सहभागी व्हावे, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक दशकांपासून महत्त्वपूर्ण योगदान देणारे शरद पवार सध्या ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांनी स्थिती स्थिर असल्याची माहिती दिली आहे. या पार्श्वभूमीवर शेकापच्या नेत्यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी जयंत पाटील आणि चित्रलेखा पाटील यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करत लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शरद पवार यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन त्यांनी पुन्हा त्याच उत्साहाने सार्वजनिक जीवनात सक्रिय व्हावे, अशी अपेक्षा राजकीय क्षेत्रातूनही व्यक्त होत आहे.

मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टला स्वपक्षातूनच प्रखर विरोध

यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रातून शिलार-पोशीर परिसरातील प्रस्तावित प्रकल्पांवर तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. 'राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः' हेच भाजपचे ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली राष्ट्राची नैसर्गिक संपत्ती आणि समृद्ध पर्यावरणाचा नाश होत असेल, तर त्याला विरोध करणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे. मी विकासाच्या विरोधात नाही, तर सरकारने निवडलेल्या चुकीच्या जागेच्या विरोधात आहे, असे रसाळ यांनी स्पष्ट केले.

भीमाशंकर अभयारण्याच्या जवळ असलेल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये शेकरू, बिबट्या, रानडुक्कर, उदमांजर यांसह दोनशेहून अधिक दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजातींचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. झाडांच्या कत्तलीमुळे पक्ष्यांची घरटी, अंडी आणि पिल्ले नष्ट होऊन संपूर्ण अन्नसाखळीवर परिणाम होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

टोरेंटसारखा तीन हजार मेगावॅट क्षमतेचा ऊर्जा प्रकल्प उभारायचाच असेल, तर त्यासाठी सह्याद्रीचीच निवड का, असा सवाल रसाळ यांनी उपस्थित केला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात मोठ्या प्रमाणावर पडीक, नापीक आणि बंजर जमीन उपलब्ध असताना तेथे सौरऊर्जा आणि बॅटरी स्टोरेज प्रकल्प उभारता येऊ शकतात. अशा पर्यायी जागांचा विचार केल्यास वृक्षतोड टाळता येईल आणि पर्यावरणाचेही संरक्षण होईल, असे त्यांनी सुचवले आहे. सरकार कोळसा वाचवण्याच्या नावाखाली ऑक्सिजन निर्माण करणारी नैसर्गिक संपत्तीच नष्ट करत असल्याची टीकाही त्यांनी केली. तुज आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी असे सुनावत सरकारने प्रकल्पाची जागा बदलावी, सह्याद्री आणि कर्जत वाचवावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. कर्जत तालुक्यात आधीच विविध प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांचे जाळे विस्तारत असून, कोंढाणे धरणाची जलवाहिनी, टोरेंटची वीज साठवणूक व पुरवठ्यासाठीची उच्चदाब विद्युत वाहिनी, टाटा पॉवरची वाढीव वीजपुरवठा वाहिनी तसेच पोशीर धरणाच्या जलवाहिन्या आणि विद्युत वाहिन्यांमुळे तालुक्याचे अक्षरशः तुकडे होतील, अशी भीती रसाळ यांनी व्यक्त केली आहे. सरकारने वेळीच जागे व्हावे आणि शिलार धरण प्रकल्प रद्द करून पर्यावरणाचा विनाश थांबवावा, अशी ठाम मागणी रसाळ यांनी केली आहे.

'जलसा'ला बॉम्बने उडवण्याची धमकी

ठिकाणांसह अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. ई-मेलची माहिती मिळताच मुंबई पोलिसांनी गंभीर दखल घेत संबंधित ठिकाणांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. धमकीचा ई-मेल कुठून पाठवण्यात आला, तो कोणी पाठवला आणि त्यामागील उद्देश काय, याचा शोध घेतला जात आहे. मुंबई पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

डॉ. विनायक पाटीलांकडे राज्याची धुरा

कमी करण्यासाठी बालरोगतज्ज्ञांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. या क्षेत्रातील डॉक्टरांना एकत्र आणणे, वैद्यकीय ज्ञान आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे, तसेच बालआरोग्यविषयक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी ही संघटना कार्यरत आहे. अशा प्रतिष्ठित राज्यस्तरीय संघटनेच्या नेतृत्वाची संधी अलिबागमधील डॉक्टरांना मिळणे, ही रायगड जिल्ह्यासाठी विशेष अभिमानाची बाब आहे.

या नव्या जबाबदारीबाबत डॉ. विनायक पाटील यांनी महाराष्ट्रातील बालआरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी निष्ठेने आणि समर्पित भावनेने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राज्यातील प्रत्येक बालकाला दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, बालआरोग्याबाबत जनजागृती व्हावी आणि आधुनिक वैद्यकीय ज्ञानाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या निवडीचे वैद्यकीय क्षेत्रासह सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

वृक्षतोडीविरोधात आदिवासी आक्रमक

सुरू झाल्यानंतर पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये संताप पसरला आहे. आता आदिवासी संघटनांनीही आंदोलनात उडी घेतल्याने प्रकल्पविरोधी संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. सह्याद्री बचाव आदिवासी संघर्ष समितीच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी झाले होते.

मोर्चानंतर प्रांत कार्यालयाबाहेर निषेध नोंदवून प्रकल्प रद्द करण्याची मागणी करण्यात आली. या मोर्चात आदिवासी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष लकी जाधव, देवराम लांडगे, पर्यावरण समितीचे ॲड. कैलास मोरे, मालू निरगुडे, कर्जत आदिवासी संघटनेचे अध्यक्ष कांता पादिर, माजी अध्यक्ष जैतू पारधी यांच्यासह रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी मान्यवरांनी भाषणांतून टोरेंट प्रकल्प आदिवासी समाजासाठी घातक असल्याची भूमिका मांडली. आदिवासींचे अस्तित्व आणि निसर्गसंपन्न परिसर उद्ध्वस्त करणारे प्रकल्प सहन केले जाणार नाहीत. आदिवासी समाज क्रांतिकारी असून आपल्या हक्कांसाठी तीव्र लढा उभारण्यास सज्ज आहे, असा इशाराही देण्यात आला.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr. No.	Tender / Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1	**Tender No:-** EE/EHV (O &M)/ DIVN/MHD/Tech/E-Tender-18/2026-27 Dtd.07.11.2026 **RFx No. - 7000042067**	**Sub :-** SRM E-tender for the work of tree cutting/chopping and removal of grass (Kashed) in hilly area at various 220KV / 100 KV EHV Lines under EHV (O&M) Dn., Mahad for FY 2026-2027.	Rs. 27,08,096/- (including GST + 1% Labour CESS)

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 07.11.2026 @ 00:00 hrs. to 16.11.2026 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in.**
Contact Person:- The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn. Mahad

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
कार्यालय : मु.वाशीवली, पो.पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड

जा.क्र. ३६०/२०२६ दिनांक : ६/११/२०२६

निविदा सुचना (शुद्धीपत्र)

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ता. खालापूर जि. रायगड हद्दीत ग्रामनिधीअंतर्गत सन २०२६/२७ करिता खालीलप्रमाणे कामे मा. उपअभियंता (बांध) उपविभाग कर्जत व मा. कार्यकारी अभियंता (बांध) विभाग अलिबाग यांचेकडील मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक ठेकेदारांकडून टक्केवारी दराने आपली सीलबंद निविदा दिनांक ७/११/२०२६ ते १६/११/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारणेत येतील.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फी	इसारा रक्कम	फंड	निविदा उघडण्याचा दिनांक
१)	मौजे : कैरे गणेशघाट दुरूस्ती करणे.	७,९९३३०/-	१००/-	८०००/-	ग्रामनिधी	१७/११/२०२६

अटी व शर्ती खालीलपमाणे :

१) सदर कामाबाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल
२) निविदेसोबत इसारा रक्कम भरणा केल्याची पावती, आधारकार्ड, पॅनकार्ड, झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
३) मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
४) शासकीय नियमाप्रमाणे आयकर, वस्तु व सेवा कराचे (GST) रकमा कपात करणेत येतील
५) बिलाचे एकूण रकमेपैकी ५ टक्के रक्कम ही काम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासुन बारा महिने कालावधीसाठी सुरक्षा अनामत म्हणून कपात करणेत येईल.
६) निविदेत सादर केलेले दर हे जी.एस.टी सहीत असावेत.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सुचनेत बदल करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत वडगांवने राखुन ठेवलेला आहे.
८) अंदाजपत्रकात ठरवून दिलेल्या तपशीलाप्रमाणे साहित्य वापर करणे बंधनकारक राहील.
९) काही अपरिहार्य कारणास्तव बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.
१०) पुर्ण करणेत आलेल्या कामाची किमान एकवर्ष विनामुल्य देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील
११) अटी व शर्तीचा करारनामा रू.५००/- स्टँप पेपरवर करून द्यावा लागेल.

श्री. सुहास विष्णु वारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

श्री. विनोद चांदोरकर
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

क्रिकेटच्या बॅटने केली मारहाण

। पनवेल । प्रतिनिधी ।

क्रिकेट खेळत असताना बॉल मुलीला लागल्याने त्याचा जाब विचारण्यात गेले असता पती-पत्नीला शिवीगाळ करून क्रिकेटच्या बॅटने मारहाण केल्याची घटना मोसारा गाव येथे घडली. या प्रकरणी दीपिका दीपक सावंत, दीपक सावंत, अजय सावंत, अक्षय सावंत (सर्व राहणार मोसरा गाव) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोन नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हे राहत असलेल्या घरासमोर अंगणात दीपिका सावंत यांची मुले क्रिकेट खेळत होती. यावेळी फिर्यादी यांच्या मुलीला बॉल लागल्याने ते जाब विचारण्यास केल्या यावेळी फिर्यादी आणि त्यांच्यात बाचाबाची झाली त्यानंतर दीपिका सावंत, दीपक सावंत, आणि अजय सावंत यांनी फिर्यादी यांच्या पतीला मारहाण केली तसेच फिर्यादी आणि त्यांच्या पतीला शिवीगाळ करून क्रिकेटच्या बॅटने मारहाण केली यात ते जखमी झाले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे अंत्रट तर्फ निड ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नांव	स.नं./हि.नं.	क्षेत्र हे.आर.पा.	आकार रू.पै.
नितीन जयराम धुळे	३०/१/ब	०-६८-० पो.ख. ०-१२-० यापैकी दिलेले क्षेत्र ०-४०-०	०.४९

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील जमिन मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील जमिन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड. अशोक पालू डुकरे
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे आशिल स्वप्निल गोपिनाथ चिंबुलकर, रा. सातिर्जे, कातळपाडा, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे लाभांत खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत मिळकतीच्या पुर्वगामी मालक सुनंदा नारायण पारधी, रा. बोरघर, ता. माणगांव जि. रायगड यांनी दि. ०६/०३/२०१४ रोजी नोंदणीकृत साठेकरार दस्त क्र. ७४०/२०१४ अन्वये बयाणा रक्कम स्विकारून लिहून दिलेला होता व त्या मिळकतीचे कधीही रद्द न होणारे कुलअखत्यारपत्र दस्त क्र.७४१/२०१४ दि. ०६/३/२०१४ रोजी आमचे आशिलांचे लाभात लिहून दिले होते त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार रु.पैसे
१	बोरघरतर्फ खरवली ता.माणगांव जि.रायगड	४०९	०.३२.६० पो.ख.०.०४.८० एकूण ०.३७.४०	२.०६
२	बोरघरतर्फ खरवली ता.माणगांव जि.रायगड	४११	०.२२.५० पो.ख. ०.०१.८० एकूण ०.२४.३०	१.०६

वर नमुद मिळकती ह्या आमचे आशिलांस साठेकरारान्वये विकत दिल्या असून सुद्धा सदर मिळकती सुनंदा नारायण पारधी यांनी त्रयस्थ इसमांस खरेदीखतान्वये विकत दिल्याचे आमचे आशिलांस समजले आहे. त्याविरूद्ध आमचे आशिलांनी योग्य तो कोर्ट दरबार न्यायालयात सुरू केलेला आहे. सदरचे त्रयस्थ इसम सदर मिळकतीचा पुन्हा व्यवहार करू पहात आहे.

तरी वर नमुद मिळकतींबाबत कोणीही, व्यक्तीने कंपनीने अथवा भागिदारी संस्थेने खरेदी व्यवहार करू नये. सदर मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०७/११/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा पो. झिराड,
ता. अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in Office Education- Bsc/ Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321
- Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321
- घरकामासाठी अर्धवेळसाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- शिवानी पेटशॉप अलिबाग/चोंढी/पेण येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. अनिल गोपाळ पाटील यांनी खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्यायेण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
भाकरवड ता.अलिबाग	४/४	०.७०.१०	९.४४

सदरहू मिळकत ही श्री. नरेंद्र पुंडलिक पाटील यांनी रा. भाकरवड, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे ताबेकब्जाची व मालकीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरुन ते दिसते. सदर मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तद्दंगभूत सर्व हक्कांगासह कायम खरेदी घेण्याची ठरविले आहे. तरी सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, खरेदी, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून खरेदीखत रजिस्टर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग
ता. ०६-११-२०२६

ॲड. शुभम प्रकाश पाटील
रा. भाकरवड, पो. पोयनाड
ता.अलिबाग,जि. रायगड
मो.नं.८९७५०७८५४५

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्ता, त्यातील सर्व प्रासंगिक हक्क यांसंदर्भात १. प्राइम हायलँड इस्टेट, एक नोंदणीकृत भागीदारी संस्था, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता -१ ० वा मजला, रिजंट चेंबर्स, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई -४०० ०२१ व २. सिला साऊथ मुंबई प्रोजेक्ट्स एलएलपी, एक मर्यादित दायित्व भागीदारी संस्था, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ए ३०१, नीलम सेंटर, ३ रा मजला, बाबुराव पेंढारकर मार्ग, ग्लॅक्सो, वरळी, मुंबई -४०० ०३० यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

कोणीही व्यक्ती वा संस्था यांचा सदर मालमत्तेसंदर्भात विक्री, अभिहस्तांकन, अभिहस्तांतरण, हस्तांतरण, विभाजन, विमोचन, परित्याग, गहाण, प्रभार, दावा, भेट, कुटुंब व्यवस्था, सामंजस्य करार, भागीदारी, हमी, सुविधाधिकार (हक्क मार्ग समाविष्ट), कर्जे, आगाऊ रकमा, न्यास, हक्क दस्तावेज जमा करणे, विकास हक्क, एफएसआय उपभोग, मृत्यूपश्चात वारसा, वहिवाट, उप-वहिवाट, उत्तराधिकार, भाडेकरार, धारणाधिकार, व्यवस्था, लाभ हितसंबंध व/वा अन्य कोणताही जप्ती, पर्यायी करार, चिन्हांकन, निषेधाज्ञा वा विचाराधीन विवाद वा कोणत्याही स्वरूपातील कोणताही करार (लेखी वा मौखिक) वा अन्यकोणत्याही स्वरूपात वा कोणतेही संयुक्त उद्यम करार व /वा अन्य कोणतीही जप्ती वा

कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम, जुना वहिवाट हक्क वा पूर्व रिक्त अधिकार वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही कोणताही दावा, हक्क, अधिकार, लाभ, मागणी, हितसंबंध व/वा प्रभार असल्यास व/वा कोणताही भार/व/वा कोणतेही अधिकार असल्यास खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्ता व /वा कोणत्याही भागावर कायद्याच्या कार्यचलनाद्वारे वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास, यामध्ये त्याचे विकास हक्क, टीडीआर/एफएसआय व/वा मालमत्तेतून उद्भवणारा संभाव्य विकास यांचा समावेश असेल यासंदर्भात त्यांनी त्यांच्या पुराव्यासहित लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा असा कथित दावा, हितसंबंध, भार वा मागणी हे सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येतील.

वरील संदर्भित अनुसूची
(मालमत्तांचे विवरण)

गाव म्हातोळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील खालील तपशिलानुसार खालील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड -

गट क्र.	क्षेत्र हेक्टर - आर मध्ये	निर्धारण (रु. पै)
१९४/२	लागवडीयोग्य ०-४०-०० पो. ख. ०-००-९० एकूण ०-४०-९०	५.४८/-
२२६/१/२	लागवडीयोग्य २-१४-४० पो. ख. ०-१७-५० एकूण २-३१-९० यापैकी ० हे. २४.३० आर क्षेत्र हे रु. १.९७ मूल्यावर करनिर्धारित	१६.४३/-
२२६/२	लागवडीयोग्य ०-२३-८० पो. ख. ०-००-५० एकूण ०-२४-३०	२.५०/-

दिनांक : ०७.११.२०२६

अधीराज हरीश
डी.एम. हरीश ॲन्ड कं., एलएलपी
वकील
३०५-३०९, नीलकंठ, ९८, मरीन ड्राइव्ह, मुंबई -४०० ००२.
notice@dmharish.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालकांकडुन कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर)	आकार (रू. पै.)
७०	६	०-९९-००	०=८१

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/११/२०२६

ॲड. महेश मोतीराम घरे
मु.सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४, ९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक शिवदत्त रामदास पाटील यांचेकडून विकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ	आकार रु. पै.
२१	६	एकुण क्षेत्र ०-४६-०० पैकी विकत देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०-२३-००	०-३१

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७/११/२०२६

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल श्रीम. अनिता भागा लबडे, रा. खानावळे, पो. पोयंजे, ता. पनवेल, जि.रायगड ४१०२२१ यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

जमीन मालक	भूमापन क्रमांक व उपविभाग	एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ)	आकार रू. पै.
श्री. अनंता बंडु तुपे	६/७/अ	क्षेत्र ०.३३.७० पोट खराबा ०.०१.५० एकुण क्षेत्र ० ३५.२०	३.२५

तरी वरील मिळकतींबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा - कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे

तारीख :- ०७/११/२०२६

ॲड. कल्याणी रवी गायकर
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

ॲड. मंदार विद्याधर ठाकूर

जाहीर समन्स (नोटीस)

(दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८, ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे)
मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पाली (जि.रायगड) यांचे न्यायालयात
नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०२५

श्री. अशोक उर्फ बाळाजी बाबू कांबळे ...वादी
रा. महागाव, ता.सुधागड, जि.रायगड
विरुद्ध
१.सौ. सुलोचना उर्फ मनु मारुती गायकवाड व इतर ...प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी क्र. ३६ : श्री. सुजित तुकाराम पठारे
रा. येथे प्रतिवादी क्र. ३६ यांचा मु.पो. खांडपोली, ता. सुधागड, जि.रायगड.

ज्याअर्थी, वरील वादी यांनी तुमच्याविरुद्ध व इतर प्रतिवादीविरुद्ध मे. पाली येथील दिवाणी न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ०६/२०२५ दाखल केला आहे. सदर दाव्यातील समन्सची तुमच्यावर नेहमीच्या मार्गाने बजावणी होऊ शकत नसल्यामुळे मेहरबान न्यायालयाने दि. ३०/०९/२०२६ रोजी केलेल्या आदेशानुसार हे समन्स दैनिक कृषीवल या वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी तुम्हाला या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः किंवा तुमच्या अधिकृत वकिलामार्फत दिनांक १४/१२/२६ रोजी सकाळी ११:०० वाजता पाली येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात हजर राहून सदर दाव्यातील तुमचे म्हणणे/लेखी जबाब सादर करावा.

सदर तारखेस तुम्ही न्यायालयात हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत प्रस्तुत दाव्याचे कामकाज तुमच्याविरुद्ध एकतर्फी (Ex-parte)चालविण्यात येईल आणि योग्य तो निकाल दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

मेहरबान न्यायालयाच्या आदेशावरुन, आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

ठिकाण : पाली
शिक्का

(सही व शिक्का)
सहाय्यक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पाली

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याचे व श्री. नरेंद्र पुंडलिक पाटील यांनी त्यांना ती विकण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
भाकरवड ता.अलिबाग	४/४	०.७०.१०	९.४४

सदरहू मिळकत ही श्री. नरेंद्र पुंडलिक पाटील यांनी रा. भाकरवड, पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे ताबेकब्जाची व मालकीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरुन ते दिसते. सदर मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तद्दंगभूत सर्व हक्कांगासह कायम खरेदी घेण्याची ठरविले आहे. तरी सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, खरेदी, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न, वस्त्र, बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून खरेदीखत रजिस्टर केले जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

अलिबाग
ता. ०६-११-२०२६

ॲड. शुभम प्रकाश पाटील
रा. भाकरवड, पो. पोयनाड
ता.अलिबाग,जि. रायगड
मो.नं.८९७५०७८५४५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे दळवी खरोशी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ४५, एकुण क्षेत्र ०-८१-१० (हे.आर.पॉ.) आकार ४.२३ (रू.पै.) या मिळकतीपैकी श्री.सचिन कमळाकर म्हात्रे यांचे मालकीची, ताबे कब्जा व वहीवाटीत असलेली, क्षेत्र ०-३५-०० (हे.आर.पॉ.) आकार १.८३ (रू.पै.) ही मिळकत, विद्यमान मालक श्री. सचिन कमळाकर म्हात्रे, रा. ताडवागळे, ता.अलिबाग यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे व त्या अनुषंगाने विद्यमान मालकांनी आमचे अशिलाकडून बयाणा रक्कम स्विकारली आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत तसेच प्रत्यक्ष ताबे कब्जात असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्यायेण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०७/११/२०२६

सही/-
(ॲड.महेश एकनाथ घरत)
'गुरूकृपा' मु.पो.खंडाळे, ता.अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ९८२२६३५५१२

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) कविता कमळाकर राऊत, २) प्रतिभा विजय ठाकूर, ३) सुविद्या नंदकुमार घरत, ४) प्रसाद आत्माराम राऊत, ५) संपदा आत्माराम राऊत यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी)	आकार (रू. पैसे)
मापगाव ता.अलिबाग	१९७	०-३१-८० पो.ख.०-०२-१० एकूण ०-३३-९०	४.१४

दिनांक : ०७/११/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

दिनांक : ०७ नोव्हेंबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे - माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
१) दिनेश विठ्ठल गोमारे २) मंगेश विठ्ठल गोमारे	९	१/ब/१	१-४३-६०	२०	२९
	यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ३० पॉ ०० मात्र.				

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/ -
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-०७/११/२०२६

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे कळंबोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) विनायक प्रमोद शानबाग २) सत्येन प्रमोद शानबाग यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे कळंबोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
२२	१	०-६०-००	१-८४

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०७/११/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आदाड, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) जनाबाई बाळकृष्ण ना



राशीभविष्य

- **मेष** : दिवसभरात महत्त्वाच्या घडामोडी घडतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. स्वमताग्रह टाळावा.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं मार्गी लागतील. आप्तेष्टांचं उत्तम सहकार्य लाभेल. जुन्या ओळखींचा लाभ घ्या.
- **मिथुन** : गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. नव्या उमेदीनं कार्यरत रहाल. आर्थिक आमिषाबाबत सावध रहावं.
- **कर्क** : कारकिर्दीत नव्या वाटा दृष्टीपथात येतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नात दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत ओढाताण राहील. वरिष्ठांशी मतभेद संभवतात.
- **कन्या** : मनाविरूध्द घटना संभवतात. स्थापत्य क्षेत्रात नव्या संधी लाभतील. वाहनांचा वापर जपून करा.
- **तूळ** : अचानक धनलाभ संभवतो. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **वृश्चिक** : मनातील इच्छा फलद्रुप होतील. भागीदारी व्यवसायात सावध रहावं. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **धनु** : अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. मुलांच्या प्रश्नांची चिंता राहील. विवाहाच्या प्रयत्नात ताण येईल.
- **मकर** : कारकिर्दीच्या क्षेत्रात तुमचं महत्त्व वाढेल. बोलण्यातून इतरांवर प्रभाव पडेल. स्पर्धेत यश मिळेल.
- **कुंभ** : मानसिक अस्वास्थ राहील. विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मीन** : नव्या ओळखी कामी येतील. व्यवसायात अडचणी वाढतील. आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं.

ब्युटी टॉक

त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यासाठी

थंडीत वातावरण कोरडं होऊ लागतं. बाहेरच्या शुष्कपणाचा आपल्या त्वचेवरही परिणाम होतो. म्हणूनच या दिवसांमध्ये त्वचेची अधिक काळजी घ्यावी लागते. थंडीत त्वचेतला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. यासाठी नेमकं काय करता येईल याविषयी...

* हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत गरम पाण्याने आंघोळ करावीशी वाटते. मात्र खूप गरम, कडकडीत पाण्यामुळे त्वचा कोरडी पडते. त्यामुळे आंघोळीसाठी कोमट पाण्याचा वापर करावा. त्यातही चेहरा थंड पाण्याने धुवावा. यामुळे त्वचेतला नैसर्गिक ओलावा टिकून राहिल आणि रोमछिद्रंही बंद होतील. तसंच आंघोळीनंतर मॉईश्चरायझर लावायला विसरू नका. यामुळे त्वचा छान टवटवीत दिसेल.

* थंडीतही त्वचा तजेलदार ठेवायची असेल तर योग्य मॉईश्चरायझरची निवड करा. त्वचा तेलकट असल्यास लाईट मॉईश्चरायझर वापरा. त्वचा कोरडी असल्यास हेवी मॉईश्चरायझरची निवड करायला हवी.

(क्रमशः)

७ नोव्हेंबर — दिन विशेष

१८८८ : थोर शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरमण यांचा जन्म.
१९९६ : नायजेरियाचे बोईंग ७२७ प्रकारचं विमान लागोसपासून आग्नेय दिशेस ४० मैलांवर कोसळलं. दुर्घटनेत १४३ ठार.
१९९६ : नासातर्फे मार्स ग्लोबल सर्वेयरचं प्रक्षेपण.
२००० : इराणने अमेरिकन वस्तूंच्या जाहिरातींवर बंदी घातली.
२००६ : प्रसिद्ध क्रिकेटपटू पॉली उम्रीगर यांचं निधन.
२०१३ : पाकिस्तानी तालिबानची सूत्रं मौलाना फजलुल्लाकडे सोपवण्यात आली.

टेक फन

कॉंप्युटरवरून करा कॉलिंग

मित्रमैत्रिणींनो, मायक्रोसॉफ्ट विंडोजवर कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून फोन करता येणं शक्य आहे.

* मायक्रोसॉफ्ट विंडोज १० वापरणाऱ्यांना लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवरूनही फोन करता येतो.

* या फीचरचा वापर करण्यासाठी तुम्हाला फोनमध्ये 'युवर फोन ॲप' डाउनलोड करावं लागेल. हे ॲप मायक्रोसॉफ्टनेच तयार केलं असून ॲंड्रॉइड ७.० आणि त्यापुढच्या व्हर्जन्सवर ते डाउनलोड करता येईल.

* या अपडेटनंतर डेस्कटॉपमध्ये डायलर आणि कॉन्टॅक्ट्सचे ऑप्शन्स दिसतील. कॉलिंग करण्यासोबतच कॉलिंग हिस्ट्रीही कॉम्प्युटरवर बघता येईल. कॉल नाकारला म्हणजे रिजेक्ट केला तर संदेश पाठवण्याचा पर्यायही डेस्कटॉपवर दिसेल.

* या अपडेटमुळे स्मार्टफोन सतत तपासावा लागणार नाही. डेस्कटॉपवरच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुम्ही आरामात बोलू शकाल.

आरोग्यमंत्र

चालणं आरोग्यदायी

आजकाल हृदयविकार, रक्तदाब या बरोबरच लठ्ठपणाची समस्याही वाढीस लागली आहे. या व्याधींवर उपचारासाठी डॉक्टरांकडे गेल्यावर आवर्जून नियमित चालण्याचा सल्ला दिला जातो. खरं तर आरोग्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने नियमित चालण्याचे बरेच लाभ आहेत. अशाच काही लाभांविषयी...



* शरीर तंदुरूस्त आणि चपळ राहण्याच्या दृष्टीने चालणं हा अत्यंत प्रभावी तसंच सोपा व्यायाम प्रकार आहे.

* सकाळी नियमित चालण्यामुळे या काळात मोकळ्या हवेतील ऑक्सिजनचा शरीराला पुरवठा होतो.

* हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेलं 'डी' जीवनसत्त्व सकाळच्या कोवळ्या उन्हातून मिळतं. त्यामुळे सकाळच्या कोवळ्या उन्हात चालण्याचा व्यायाम अवश्य केला पाहिजे.

* चालण्यामुळे एकाच वेळी शारीरिक आणि मानसिक व्यायाम होतो. साहजिक या दोन्ही व्यायामांचे लाभ प्राप्त होतात.

* सततच्या कामामुळे तन-मनाला आलेला थकवा दूर करण्यासाठी चालण्याचा व्यायाम लाभदायक ठरतो.

* दररोज एक तास चालल्यास संधिवाताचा त्रास कमी होऊ शकतो, असं संशोधनातून दिसून आलंय.

* चालण्यामुळे पचनक्रिया सुधारते. तसंच मलबध्दतेसारखे, पचनाचे विकार कमी होतात.

भटकंती

या किल्ल्याच्या आसपासचं सौंदर्य नजरेत भरणारं आहे. माथेरानच्या विविध कोपऱ्यांमधून हा किल्ला दिसतो. प्रबळगड चढणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. हा ट्रेक टेकडीच्या पायथ्यापासून सुरू होतो. हा पायथा वरडोली गावापासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. हा ट्रेक खूप कठीण नाही. मात्र वळणावळणाचे रस्ते असल्यामुळे जाणकार व्यक्ती सोबत असणं गरजेचं आहे. नवख्या ट्रेकर्सनी कोणाची तरी सोबत घ्यावी. फक्त ट्रेकिंगचा विचार करत असाल तर प्रबळगडला जायला काहीच हरकत नाही.

पंचांग

शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. १३, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : चित्रा, योग : प्रीति, सूर्योदय ६.४४, सूर्यास्त ६.०१

फॉरवर्ड्स

मुज़रे सी होतीं हैं वफ़ादारी साहब...

लोग़ देख़ना चाहतें हैं, करना नहीं...!

करिअरवाटा

बना डेटा सायंटिस्ट

सध्याचं युग हे माहिती-तंत्रज्ञानाचं तसंच संगणकाचं आहे. साहजिक विविध क्षेत्रात संगणकाचा वापर बराच वाढला आहे. अशा स्थितीत डाटा स्टोरेजचं महत्त्व सर्वच जाणतात. आजकाल डाटा पेंटाबाईटमध्ये स्टोअर केला जातो. गुगल, अमेजन, मायक्रोसॉफ्ट, लिंक्डइन, फेसबुक आणि ट्विटरसारख्या डाटा स्टोअर करणाऱ्या कंपन्यांमध्ये डाटा सायंटिस्टची विशेष मागणी असते. सोशल नेटवर्किंग साईट विस्तारताहेत त्याबरोबर डाटा सायंटिस्टची मागणी वाढतेय. चांगला डाटा सायंटिस्ट आकडेवारीचा बारकाईनं अभ्यास करून योग्य निष्कर्ष समोर ठेवतो. डाटा सायंटिस्ट रिसर्चमध्ये माहितीचं विश्लेषण, संरक्षण आणि व्यवस्थापन या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. उपलब्ध माहितीचं आकलन आणि वर्गीकरण हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. डाटा सायन्सचे अभ्यासक्रम देशातल्या मोजक्या विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहेत. उत्तम गणिती कौशल्य, संवाद कौशल्य, व्यवसाय नीट जाणून घेण्याचं कौशल्य, स्पर्धात्मक वातावरणात पुढं राहण्याचं कौशल्य, विश्लेषण कौशल्य, सांख्यिकी मॉडेल्स तयार करण्याचं कौशल्य आदी गुणांनी युक्त उमेदवार या क्षेत्रासाठी लायक ठरतात. हे शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सुरूवातीपासून गलेलठ्ठ पॅकेज मिळू शकतं. कारकिर्दीच्या या वाटेचा अवश्य विचार करायला हवा.



खेचाखेची

सुख

सरदार संतासिंग ज्योतिषाला : माझं लग्न कधी होणार ?

ज्योतिषी : तुझ्या नशिबात लग्नाचा योग नाही.

संता : का ?

ज्योतिषी : अरे, तुझ्या नशिबात अपार सुख लिहीलंय !

वेगळं काही

अमेरिकेतल्या नेब्रास्का प्रांतातला यू ट्यूबर जिमी डोनाल्डसन उर्फ मिस्टर बीस्टने दोन कोटी रोपटी लावण्याचा संकल्प केला आहे. या कामासाठी १४२ कोटी रुपयांचा निधी जमवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या उपक्रमाची सुरूवात झाली आहे. दोन आठवड्यांमध्ये जवळपास ९० कोटी रुपयांचा निधी जमवण्यात मिस्टर बीस्टला यश आलं आहे. हा एक विक्रमच आहे. मिस्टर बीस्टने सुरू केलेला हा उपक्रम ६०० पेक्षा अधिक यू ट्यूबर्स पुढे नेत आहेत. मिस्टर बीस्टने या कामासाठी 'आर्बर डे फाउंडेशन'सोबत सहकार्य केलं आहे. एका रोपट्यासाठी एक डॉलर नावाचा त्यांचा उपक्रम बराच लोकप्रिय झाला आहे. यासोबतच 'टीमट्रीज फंडरेझर'ची सुरूवात करण्यात आली आहे.

सौंदर्यसाधना

सुंदर मी होणार...

तुळशी विवाहानंतर लग्नसराई सुरू होते. विवाह हा प्रत्येकीच्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा प्रसंग असतो. विवाहात नवरीचं सौंदर्य खुलायला हवं. यासाठी सहा महिने आधीपासून ब्युटी पार्लरची महागडी पॅकेज घेतली जातात. पण हे सौंदर्य काही काळानंतर फिकं पडू लागतं. त्यादृष्टीने काय करायला हवं, जाणून घ्या.



* काही दिवस आधीपासून चेहरा नीट स्वच्छ करायला सुरूवात करा. यामुळे तेलकटपणा कमी होऊन ओलावा टिकेल. आठवड्यातून दोनदा स्क्रबिंग करा. यामुळे त्वचा आतपर्यंत स्वच्छ होते. मृत त्वचा निघून जाते. सौम्य स्क्रबमुळे त्वचेवरील छिद्रं मोठी होत नाहीत. * थंडीत अनेकींना टॅनिंगची समस्या भेडसावते. यासाठी त्या अँटी टॅन ट्रिटमेंट घेतात. पण टॅनिंगचा त्रास टाळण्यासाठी थंडीतही सनस्क्रीन लावून बाहेर पडा. जेलवालं सनस्क्रीन लावा. घराबाहेर पडण्याआधी साधारण १० ते १५ मिनिटं सनस्क्रीन लावा. * थंडीत त्वचा कोरडी पडते. हे लक्षात घेता त्वचेतला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी दर तीन तासांनी चेहऱ्यावर मॉईश्चराझर लावा. लग्नाच्या तारखेच्या तीन ते चार महिने आधीपासूनच मॉईश्चरायझरचा वापर करायला सुरूवात करा.

सुडोकू १७१

		१		४		५		
५			२		८			
	२						१	९
		७			३		९	
६	१		४		५		२	३
	८		९			४		
९	७						३	
			३		७			५
		५		९		२		

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १७०चे उत्तर

५	३	८	१	६	४	२	९	७
७	९	२	८	५	३	६	४	१
१	४	६	७	९	२	८	३	५
९	८	३	५	४	७	१	६	२
६	७	१	९	२	८	३	५	४
४	२	५	६	३	१	९	७	८
३	६	७	२	८	५	४	१	९
२	५	४	३	१	९	७	८	६
८	१	९	४	७	६	५	२	३

शब्दकोडे क्रमांक १७१



उभे शब्द:-

१) ह्या वनस्पतीचे लग्न लावले जाते
२) न दिसणारी जखम
३) पुष्पगुच्छ
४) पती
५) साळुंखी
६) मधून मधून तुटलेला
७) कुस्ती खेळण्याची जागा
८) जाणीव
९) हिंदी चित्रपटातील अभिनेत्यांना आवडणारा एक गोड पदार्थ
१४) निकट
१५) जननी
१६) भ्रमर
१८) धोबी
१९) सैन्याचे पथक
२१) चणचण, दुर्भिक्ष
२३) चिखल
२५) हमाल
२६) हिंदीत आश्वासन
२७) तीन पट
२८) मच्छर
३०) वार, दिन
३१) स्पष्ट (उत्तर)
३३) आंब्यांचा राजा
३५) पावसाची धार
३६) युद्धात आलेला मृत्यू
३७) फुरसत
३९) गालफडे बसलेला
४१) समय
४३) तापापूर्वीची लक्षणे, अंग दुखणे
४५) सोन्या-चांदीचा व्यापारी
४६) अमर्यादित
४८) वचक, दरारा
५१) न्याहरी
५२) कापडाची वीण
५३) जाणकार
५४) अवधान, लक्ष
५६) जमीनजुमला
५७) सूर्याचे एक नाव
५८) सरबत इ. पेय
५८) व्यायाम
६१) मेहनत, त्रास
६२) जादू, भ्रम
६४) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
६६) मगज
६७) सेनापती
६९) एक बारीक धान्य
७०) रानरेडा
७१) कुलूप उघडण्याचे साधन

आडवे शब्द :-

१) सुभाषचंद्र बोस यांनी देशाला घातलेली साद
१०) हिंदीत काळा रंग
११) अपशकुन
१२) खनिजांचे घर
१३) *** आगा एक अभिनेत्री
१५) विश्रांती
१७) पांढुरका रंग
१९) वेतन
२०) वितुष्ठ, बेबनाव
२२) जबाबदारी, अग्रभाग
२४) एक मोठे चर्मवाद्य
२५) तांदूळ शिजविलेले तांदूळ
२६) वेडावाकडा
२९) पत्र
३०) डौलदार, ऐटबाज
३२) चंदनाचे खोड उगाळण्याचा दगड
३४) पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
३५) सटवाई
३८) अगदी सत्य
४०) रीत, पद्धत
४२) नवरदेव
४४) सत्वांश
४६) जल
४७) किंचित, थोडे
४८) धैर्य, साहस
४९) रात्रीच्या रात्रीच
५०) एक चर्मवाद्य
५२) पाठीला आलेली वक्रता
५३) क्षमा केलेला
५५) अतितिखट मसालेभात
५८) हिंदीत जवळ
५९) हात
६०) अजाणता
६२) मान्य करणे
६३) शोध, माग
६५) पालिकेतील लोकप्रतिनिधी
६८) मोजकेपणा, मितता
७०) एक शेंगभाजी
७२) रुपेरी मुलामा
७३) होडी चालविणारा
७४) अधिकारी, मालक

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

लो	क	ना	य	क	■	स	क्ष	म	■	फा	से	पा	र	धी
ह	र	क	■	था	पा	ड्या	■	नो	क	र	■	क	द	र
घुं	■	■	कं	क	र	■	पो	ह	रा	■	मा	ळी	■	■
ब	द	क	■	थ	■	मौ	■	र	म	णी	य	■	■	त
क	ल	■	मा	न	ध	न	■	■	त	■	■	ता	त	डी
■	द	क्ष	ता	■	■	■	मा	सा	■	क	जा	ग	■	पा
प	ल	■	पि	त	ळ	उ	घ	डे	प	ड	णे	■	ख	र
र	■	स	ता	र	■	रो	■	सा	द	■	■	दा	स	■
ता	■	म	■	बे	री	ज	■	ती	र	क	मा	न	■	क
वा	ज	त	गा	ज	त	■	व	■	मो	■	न	वी	■	म
■	पा	ल	व	■	स	■	स	व	ड	■	व	र	व	र
म	न	■	क	द	र	दा	न	■	■	दा	ता	■	■	क
हा	■	वा	री	■	■	ह	वा	ल	दा	र	■	स	क	स
रा	■	द	■	■	चु	क	त	■	द	■	बा	द	ल	■
ज	न	क	क	न्या	■	ता	■	द	ला	ई	ला	मा	■	ओ

कलासक्त

'शिकायला गेलो एक'
नाटकाने जिंकली अलिबागकरांची मने

संदीप गोठीवरेकर

अलिबागच्या सांस्कृतिक विश्वात नाट्यरसिकांसाठी आनंदाची पर्वणी ठरलेले 'शिकायला गेलो एक' हेनाटक गेल्या तीन महिन्यांपासून प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करत आहे. या नाटकाला अलिबागकर रसिक प्रेक्षकांकडून मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद उल्लेखनीय असून, प्रत्येक प्रयोगानंतर प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आणि टाळ्यांचा कडकडाट हेच या यशाचे खरे प्रमाण ठरत आहे. प्रशांत दामले यांची रंगभूमीवरील सहज, प्रभावी आणि अनुभवसंपन्न अभिनयशैली हे या नाटकाचे मोठे आकर्षण आहे.

त्यांच्या अभिनयातील अचूक टायमिंग, संवादफेक, चेहऱ्यावरील हावभाव आणि प्रसंगानुरूप विनोद यामुळे नाटकातील प्रत्येक क्षण जिवंत होतो. सहकलाकारांची उत्तम साथ, प्रसंगांची बांधणी आणि रंगमंचावरील उत्साही सादरीकरण यामुळेनाटकाची रंगत अधिकच वाढते.नाटकातील संवाद, विनोदी प्रसंग आणि कलाकारांमधील रंगतदार जुगलबंदी प्रेक्षकांना खळखळून हसवते; तर काही प्रसंग विचार करायलाही भाग पाडतात. केवळ विनोदाची पेरणी न करता कथानकातून मनोरंजनासोबतच आशयपूर्ण अनुभव देण्याचा प्रयत्न या सादरीकरणातून जाणवतो. त्यामुळे विविध वयोगटांतील प्रेक्षकांना हे नाटक आपलेसे वाटत आहे. रंगमंचावरील प्रसंगात कलाकारांचा उत्स्फूर्त अभिनय. रंगमंचावरील नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा आणि प्रसंगानुरूप हालचाली यांची ही नाटकाच्या प्रभावी सादरीकरणात महत्त्वाची भूमिका आहे. कलाकारांचा एकमेकांशी असलेला संवाद आणि प्रसंगानुसार बदलणारी देहबोली यामुळे प्रेक्षक नाटकात गुंतून राहतात. विनोदाची योग्य वेळ साधत कथानक पुढे नेण्याची हातोटी या नाटकाच्या सादरीकरणाला विशेष उठाव देते. प्रशांत दामले आणि सहकलाकार यांच्यातील रंगतदार संवादाचा क्षण.

अलिबागसारख्या सांस्कृतिक जाणीव जपणाऱ्या शहरात नाटकाला मिळणारा हा प्रतिसाद निश्चितच कौतुकास्पद आहे.

नाटक पाहण्यासाठी येणाऱ्या रसिकांची उपस्थिती, प्रयोगानंतर व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रिया आणि कलाकारांविषयीचा आदर यामुळे स्थानिक नाट्यचळवळीला नवी ऊर्जा मिळत आहे. मनोरंजनाच्या विविध माध्यमांमध्येही रंगभूमीची जादू आजही कायम असल्याचे या प्रतिसादातून पुन्हा एकदा अधोरेखित होते. उत्स्फूर्त अभिनयातून रंगत आणणारा नाटकातील आणखी एक प्रसंग.

'शिकायला गेलो एक' या नाटकाने अलिबागच्या रसिकांच्या मनात निर्माण केलेले स्थान आणि तीन महिन्यांपासून मिळणारा भरघोस प्रतिसाद पाहता, या नाटकाची लोकप्रियता किती प्रभावी आहे याची जाणीव होते. कलाकारांची मेहनत, दर्जेदार सादरीकरण आणि प्रेक्षकांचे प्रेम यांचा सुंदर संगम या नाटकातून अनुभवायला मिळतो. अलिबागच्या नाट्यप्रेमींसाठी हा अनुभव निश्चितच संस्मरणीय ठरत असून, रंगभूमीवरील अशा उत्तम कलाकृतींना रसिकांनी असाच भरभरून प्रतिसाद द्यावा, हीच अपेक्षा.



संस्कृती, समृद्धी आणि सजगतेचा दीपयोग

अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दीपोत्सव हा केवळ दिव्यांचा सण नसून भारतीय संस्कृती, अर्थव्यवस्था आणि मानवी मूल्यांचा अनोखा संगम आहे. रामायणापासून नरकचतुर्दशीपर्यंतच्या पौराणिक संदर्भांनी समृद्ध असलेला हा उत्सव बाजारात चैतन्य फुलवतो, वंचितांच्या दारी उजेड पेरण्याची शिकवण देतो; पर्यावरणाचे भान जपत निसर्गाशी नाते जोडण्याचेही आवाहन करतो. आता समाजाला त्याचे मनस्वी वेध लागले आहेत.

प्रा. मुक्ता पुरंदरे

भारतीय सण-परंपरेत 'दीपावली' अथवा 'दिवाळी' या उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शरद ऋतूच्या निरोपाची आणि हेमंत ऋतूच्या आगमनाची चाहूल लागत असताना, आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया या काळात साजरा होणारा हा दीपोत्सव केवळ धार्मिक कर्मकांडापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून मानवी जीवनाला समृद्ध करणारा एक महाउत्सव आहे. घराघरांच्या उंबरठ्यावर लागणाऱ्या छोट्या; पण तेजोमय पणत्या संपूर्ण जगाला एकात्मतेचा, आशेचा आणि नवसंजीवनीचा संदेश देतात. दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला स्वतंत्र धार्मिक आणि पौराणिक संदर्भ लाभलेला आहे. या उत्सवाची पाळेमुळे हजारो वर्षे जुन्या भारतीय आख्यायिकांमध्ये रुजली आहेत. उत्तर भारतात दिवाळीचा थेट संबंध प्रभू श्रीरामांच्या अयोध्येतील पुनरागमनाशी जोडला जातो. चौदा वर्षांचा वनवास संपवून, लंकापती रावणाचा वध करून अधर्मावर धर्माचा विजय प्रस्थापित केल्यानंतर श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्यावासीयांनी तूप-तेलाचे अगणित दीप प्रज्वलित करून संपूर्ण नगरी उजळवून टाकली होती. तो दिवस म्हणजे कार्तिक अमावस्येचा दिवस मानला जातो, ज्या दिवशी आजही लक्ष्मीपूजन मोठ्या भक्तीभावाने केले जाते.

महाराष्ट्रासह संपूर्ण दक्षिण भारतात नरकचतुर्दशीचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. भगवान श्रीकृष्णाने अत्याचारी, प्रजाहिंसक असुर नरकासुराचा वध करून त्याने बंदी बनवलेल्या सोळा हजार स्त्रियांना मुक्त केले आणि समाजाला अन्यायाच्या पाशातून सोडवले. या विजयाचे प्रतीक म्हणून नरकचतुर्दशी साजरी केली जाते. या दिवशी पहाटे उठून अभ्यंगस्नान करण्याची प्रथा आहे. ती शरीरावरील व मनातील मळ धुवून काढून नवीन तेजाने जीवन जगण्याची प्रेरणा देते. धनत्रयोदशीच्या दिवशी आयुर्वेदाचे प्रवर्तक भगवान धन्वंतरी यांची जयंती साजरी केली जाते, जी आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करते. याच दिवशी कुबेर आणि लक्ष्मीची आराधना करून धनाचा आदर करण्याची शिकवण दिली जाते. बलिप्रतिपदेला, म्हणजेच दिवाळी पाडव्याला, वामन अवतारात विष्णूने दानशूर राजा बळीचे केलेले कल्याण आणि त्याला दिलेला पाताळातील राज्याचा आशीर्वाद याचे स्मरण केले जाते. शेवटी येणारी भाऊबीज किंवा यमद्वितीया बहीण-भावाच्या निस्वार्थ प्रेमाचा, आपुलकीचा आणि संरक्षणाचा धागा अधिक घट्ट करणारी ठरते. थोडक्यात, दिवाळीतील प्रत्येक दिवस हा अनिष्टावर इष्टाचा, असत्यावर सत्याचा आणि अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवतो. आपल्या संस्कृतीत 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना अत्यंत मूलभूत मानली जाते. अंधाराकडून प्रकाशाकडे प्रवास करणे हाच दिवाळीचा खरा आध्यात्मिक उद्देश आहे. आपल्या अंतर्मनातील षडरिपू असलेल्या काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या मर्यादांचा अंधार दूर करून तेथे सद्विचारांचा, ज्ञानाचा आणि प्रेमाचा दिवा लावणे, हे या सणाचे मर्म आहे.

पावसाळा सरल्यानंतर घरात आणि परिसरात साचलेली घाण, धूळ स्वच्छ करून घराला रंगरंगोटी केली जाते. हा केवळ घराचा कायापालट नसतो, तर शरीराचे स्वास्थ्य आणि मनातील नकारात्मकता दूर सारण्याचा एक प्रयत्न असतो. एकत्र कुटुंब, नातेवाइक, शेजारीपाजारी यांच्यात गोडधोड वाटून सामाजिक सलोखा आणि सुसंवाद वृद्धिंगत करणे हाही या उत्सवाचा मुख्य सामाजिक उद्देश आहे. दिवाळी भारताच्या अर्थव्यवस्थेचे 'ग्रोथ इंजिन' मानली जाते. संपूर्ण वर्षात होणाऱ्या खरेदी-विक्रीच्या तुलनेत दिवाळीच्या काळात होणारी उलाढाल ही देशांतर्गत बाजारपेठेला प्रचंड गती देते. छोट्या किराणा दुकानदारापासून मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांपर्यंत प्रत्येकासाठी हा काळ सुगीचा ठरतो. दिवाळीच्या खरेदीत सोने, चांदी, हिरे यांसारख्या मौल्यवान धातूंपासून कपडे, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, वाहने, स्थावर मालमत्ता (रिअल इस्टेट) आणि गृहसजावटीच्या वस्तूंचा प्रचंड मोठा वाटा असतो. 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (कैट) च्या अंदाजानुसार, दर वर्षी दिवाळीमध्ये देशपातळीवर कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. यामुळे उत्पादन क्षेत्राला नवी उभारी मिळते, साठा संपून नवीन उत्पादनाची मागणी वाढते आणि वाहतूक, पॅकेजिंग यासारख्या संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतो. या आर्थिक उलाढालीचे सर्वात सुंदर वैशिष्ट्य म्हणजे यातील संपत्तीचे विकेंद्रीकरण. केवळ मॉल्स किंवा ई-कॉमर्स कंपन्याच नव्हे, तर रस्त्याच्या कडेला पणत्या, मातीची खेळणी, आकाशकंदील, रांगोळीचे रंग, फुले विकणारे लहान कारागीर आणि विक्रेते यांच्या हातालाही या काळात काम मिळते.

या काळात शेतकऱ्यांचा नवा शेतमाल बाजारात आलेला असतो. त्यामुळे ग्रामीण अर्थकारणातही तरलता येते. अशा प्रकारे दिवाळी बाजारात अभूतपूर्व उत्साह आणि चैतन्य निर्माण करून संपूर्ण देशाला आर्थिक गती प्रदान करते. दिवाळीचा खरा आनंद हा केवळ स्वतःचे घर सजवण्यात आणि स्वतःच्या ताटात गोडधोड पदार्थ वाढण्यात नाही. आपल्या घरात आनंद साजरा करताना समाजातील उपेक्षित आणि दुर्बल घटकांच्या आयुष्यात प्रकाश कसा आणता येईल, याचा विचार करणे हेच भारतीय संस्कृतीचे मूळ तत्त्व आहे. 'सर्वे भवन्तु सुखिनः' ही भावना दिवाळीच्या सणात प्रत्यक्ष उतरली पाहिजे. या काळात आपण खरेदी करत असलेल्या पणत्या, आकाशकंदील किंवा मातीच्या वस्तू तयार करणाऱ्या कुंभार आणि कारागिरांच्या मेहनतीला योग्य मोबदला देऊन आधार देणे हे आपले कर्तव्य आहे. रस्त्यावर बसून किरकोळ वस्तू विकणाऱ्या आजी-आजोबांशी सौदेबाजी न करता सन्मानपूर्वक पैसे देऊन त्यांच्या घरातही सणाची चूल पेटू देणे ही खरी दिवाळी आहे. आपल्या सुबत्तेतील काही वाटा अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कामगार किंवा घरकाम करणाऱ्या सहाय्यक वर्गाला गोडधोड, कपडे किंवा आर्थिक स्वरूपात देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे म्हणजेच लक्ष्मीपूजन होय. ज्या दिवशी एका श्रीमंत व्यक्तीच्या घरासोबतच एका गरिबाच्या झोपडीतही आशेचा दिवा तेवतो, त्याच दिवशी दिवाळी खऱ्या अर्थाने सार्थक ठरते. आनंद हा वाटल्याने द्विगुणित होतो, हा दिवाळीचा सर्वात मोठा धडा आहे.

गेल्या काही दशकांमध्ये शहरीकरण, चंगळवाद आणि बदललेल्या जीवनशैलीमुळे आपल्या पारंपारिक सणांचे स्वरूप काहीसे बदलले आहे. पूर्वी सण निसर्गाच्या कुशीत, निसर्गाला कसलीही इजा न पोहोचवता साजरे केले जात असत; मात्र आज उत्सवाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर कचरा, प्लास्टिकचा वापर आणि ध्वनी-वायू प्रदूषण होताना दिसते. हा आनंद साजरा करताना निसर्गाचे आणि पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे आज काळाची गरज बनली आहे. सजावटीसाठी थर्माकोल आणि अविघटनशील प्लास्टिकच्या साहित्याचा अनिर्बंध वापर केला जातो, जो सण संपल्यावर रस्त्यावर कचऱ्याच्या रूपात पडून राहतो. त्याऐवजी नैसर्गिक फुले, कापडी पताका, पुनर्वापर करता येण्याजोगे आकाशकंदील आणि पारंपरिक मातीच्या पणत्यांचा वापर करून आपण पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करू शकतो. आपल्याला भरभरून देणाऱ्या निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हाच सणांचा मूळ हेतू असावा. दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा गेल्या काही वर्षांमधील अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय बनला आहे. फटाके वाजवणे ही केवळ काही क्षणांची मौज असू शकते; परंतु त्याचे दूरगामी दुष्परिणाम संपूर्ण सजीव सृष्टीला भोगावे लागतात. फटाक्यांमधून बाहेर पडणाऱ्या धुरामध्ये सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड यांसारखे विषारी वायू आणि 'पार्टिक्युलेट मॅटर' हे सूक्ष्म कण मोठ्या प्रमाणात हवेत मिसळतात. यामुळे हवेचा दर्जा निर्देशांक धोकादायक पातळीवर पोहोचतो. दम्याचे रुग्ण, वृद्ध, गरोदर महिला आणि लहान मुले यांच्या फुफ्फुसांवर याचा अत्यंत घातक परिणाम होतो.

अनेक शहरांमध्ये दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी विषारी धुक्याची चादर पसरलेली दिसते. त्यातून डोळ्यांची जळजळ आणि श्वसनाचे आजार उद्भवतात. फटाक्यांमुळे केवळ हवेचेच नाही, तर प्रचंड ध्वनीप्रदूषणही होते. अतिउच्च डेसिबलच्या आवाजामुळे कानाचे पडदे फाटण्याची भीती असते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक अस्वस्थता निर्माण होते. या फटाक्यांचा सर्वात मोठा फटका मुक्या प्राण्यांना आणि पक्ष्यांना बसतो. कुत्री, मांजरी आणि इतर पाळीव तसेच भटके प्राणी फटाक्यांच्या आवाजाने भयभीत होऊन सुरक्षित जागा शोधण्यासाठी सैरभैर पळतात, अनेकदा जखमी होतात. झाडांवर बसलेले पक्षी किलबिलाट करत अंधारात इकडेतिकडे उडताना अपघातग्रस्त होतात. या संदर्भात हरित फटाक्यांचा पर्याय पुढे आला असला, तरी फटाक्यांवर होणारा अवाजवी खर्च टाळून तोच पैसा सामाजिक उपक्रमांसाठी किंवा गरजूंच्या मदतीसाठी वापरणे अधिक श्रेयस्कर ठरेल. प्रकाशोत्सवात आवाजाचा धिंगाणा आणि धुराचे साम्राज्य कशासाठी, असा आत्मपरीक्षणाचा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. दिवाळी हा अंधारावर मात करणारा, जगण्याला नवा अर्थ देणारा आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारा सण आहे. पौराणिक आख्यायिकांमधील नैतिक मूल्ये जपत, धार्मिक विधींमधील पावित्र्य सांभाळत असतानाच आधुनिक काळातील सामाजिक आणि आर्थिक आव्हानांचे भान आपल्याला ठेवावे लागेल.

या काळात बाजारातील खरेदीतून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देताना वंचितांच्या घरात आनंदाचा प्रकाश पोहोचवणे आणि निसर्गाला कोणतीही हानी न पोहोचवता शांत, प्रदूषणमुक्त आणि संवेदनशील पद्धतीने सण साजरा करणे, हीच आजच्या काळातील खरी 'दीपपूजा' ठरेल. मातीच्या पणतीचा मंद पण शाश्वत प्रकाश आपल्या मनातील संकुचितपणा जाळून टाकेल, तेव्हाच प्रत्येक घरात खऱ्या अर्थाने सुखाची आणि समृद्धीची दिवाळी साजरी होईल.

देशविदेशांत उत्साहात साजरा होणारी दीपावली!

जगन घाणेकर

घरोघरी आनंदाचे तोरण चढवणारी भारतीय दिवाळी आता विदेशांतही चैतन्याची रुजवात करत आहे. दिवाळी थेट अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या घरापर्यंत पोहोचली आहे, तर इंग्लंडच्या रस्त्यांवरही तिची धूम दिसते. अलिकडे सगळे जगच एक ग्लोबल व्हिलेज झालेले असल्याने प्रत्येक देशातच विविध देशांतील लोक कामधंदा आणि शिक्षण यानिमित्ताने जातात. कालांतराने स्थायिकही होतात. भारतीय लोक त्याला अपवाद नाहीत. लोकांसमवेत त्यांची संस्कृती, भाषा आणि सण हे सगळे आलेच. त्यामुळे आता जगभर पसरलेल्या भारतीयांनी दिवाळी अथवा दीपावली हा सणही जगभर नेला आहे. त्यात विविध वेशभूषा, भारतीय मिष्टान्ने, फराळाचे पदार्थ, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी, मेंदी, दिव्यांची, इतर आरास आणि शोभेचे दारूकाम असतेच. भारताशेजारच्या, तसेच पुढारलेल्या काही देशांतून तो साजरा करतांना भारतापेक्षा वेगळ्या काय गोष्टी असतात, ते पाहूया.

१. विविध प्राण्यांप्रती कृतज्ञता म्हणून त्यांचे पूजन करून दिवाळी सण साजरा करणारा नेपाळ !

भारताचा शेजारी असलेल्या नेपाळमध्ये दिवाळी सण तिहार म्हणून साजरा केला जातो. यातील पहिला दिवस काग तिहार म्हणजे कावळ्यांचा दिवस! कावळ्यांसाठी गोडधोड पदार्थ घराच्या छपरावर ठेवून दिले जातात. कावळ्यांचे ओरडणे हे दुःख आणि मृत्यूचे प्रतीक असल्याने सणापूर्वी ते दूर करण्यासाठी हा नैवेद्य! दुसऱ्या दिवशी चक्क कुत्र्यांची पूजा होते. त्याला कुकुर तिहार म्हणतात. माणसाच्या कुत्र्याशी असलेल्या अतूट नात्याचा आदर करणे ही त्यामागची भूमिका. या दिवशी कुत्र्याला कुंकवाचा टिळा लावून, गळ्यात झेंडूची माळ घालून त्याला गोडधोड दिले जाते. नंतर गाय तिहार म्हणजे गायीची पूजा ! शेवटी लक्ष्मीपूजनही होते.

२. दिव्यांची रोषणाई करून दिवाळी साजरी करणारा इंडोनेशिया

इंडोनेशियामध्ये म्हणजे मुख्यतः बाली बेटांमध्ये देवळांना दिव्यांची रोषणाई उत्तम तऱ्हेने केली जाते. शिवाय दिवाळी धमाका म्हणून नृत्य आणि विविध प्रकारच्या वेशभूषा स्पर्धा यांचेही समारंभ जागोजागी साजरे होतात.

३. दिव्यांची आरास करून उत्साहाने दिवाळी साजरा होणारे सिंगापूर

सिंगापूरमध्ये अनेक भारतीय स्थायिक झालेले आहेत. तिथे दिवाळी आपल्यासारखीच दणक्यात साजरी होते. सुरक्षा आणि ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी मात्र तिथे सार्वजनिक आतषबाजीला कटाक्षाने बंदी आहे. येथील दिव्यांच्या आरासमध्ये भारताचा राष्ट्रीय पक्षी असलेल्या मोराचे आकर्षक रूप सगळीकडे विपुल प्रमाणात वापरलेले दिसत

४. बाहुल्यांच्या खेळाद्वारे रामायण आणि महाभारत यांचे दर्शन घडवून मलेशियातील दिवाळी साजरी !

मलेशियामध्ये दिवाळीत शॅडो पपेट म्हणजेच सावल्यांचा खेळ मोठ्या प्रमाणात दाखवला जातो. रामायण आणि महाभारत यांतील कथा बाहुल्यांच्या खेळाद्वारे दाखवण्याचे हे कलाकृतीपूर्ण काम असून, या आकृत्या म्हशीच्या कातड्यापासून बनवल्या जातात. त्यांना रंग देऊन, सर्व प्रकारची आभूषणे, वस्त्रे आणि मुकुट घालून त्यांचे नृत्य दाखवले जाते.

५. नदीत दिवे सोडून दिवाळी साजरी करणारा थायलंड

थायलंडमध्ये दिवाळी लुई क्रॅथोंग म्हणून साजरी केली जाते. दीपावली म्हणून सिद्ध केलेले दिवे मात्र केळीच्या झाडाच्या पानांपासून बनवले जातात. असे सहस्रो दिवे नदीमध्ये सोडलेले असतात. हा दीपोत्सव अत्यंत नयनरम्य असतो.

६. दिव्यांच्या रोषणाईची स्पर्धा आयोजित करणारा फिजी

फिजी या पॅसिफिक बेटात निळीच्या उद्योगासाठी अनेक वर्षांपूर्वी गेलेले भारतीय मजूर कायमचे तिथे स्थायिक झाले आहेत. सध्या फिजीमधील ३८ टक्के लोक भारतीय वंशाचे असून, तिथे पारंपरिक पद्धतीने अतिशय जोरदारपणे दिवाळी साजरी होते. नादी या शहरामध्ये सिगाटोका, लाउटोका आणि डेनाराऊ या आसपासच्या गावांतून आणि खेडेगावांतून विशेषतः दिवाळीसाठी विशेष बसगाड्या सोडल्या जातात. या शहरातील एक आगळीवेगळी परंपरा म्हणजे दिव्यांच्या रोषणाईच्या स्पर्धा. फिजीच्या पंतप्रधानांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या स्पर्धेला प्रारंभ होतो.

७. महाराष्ट्राप्रमाणेच फराळाचे पदार्थ बनवून साजरी होणारी अमेरिकेतील दिवाळी

दिवाळीचा सण अमेरिकेतही आनंदाची बरसात करतो. तेथील सहस्रो भारतीय लोक त्यांच्या घरी दिवाळी साजरी करतातच; पण आता भारतीय शहरांच्या धर्तीवर अनेक ठिकाणी दिवाळीनिमित्त विशेष मिठाई बनवल्या आणि विकल्या जातात. अमेरिका, इंग्लंड, न्यूझीलंड या देशांत स्थायिक झालेल्या अनेक गुजराती स्त्रियांनीही हा गृहोद्योग चालू केला आहे. चकल्या, लाडू, शंकरपाळे यांसारख्या पदार्थांचा पुरवठा करण्यासाठी त्या आधी महिनाभर कार्यरत असतात. जॉर्ज बुश अमेरिकेचे अध्यक्ष असतांना वर्ष २००३ पासून त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये दिवाळी साजरी करण्याचा प्रघात चालू केला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी वर्ष २००९ मध्ये स्वतःच्या अध्यक्षीय घरात पूर्वेकडील खोलीमध्ये वैदिक मंत्रांच्या घोषात दीपप्रज्वलन केले होते.

८. संयुक्त राष्ट्रांत सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे साजरी होणारी दिवाळी

संयुक्त राष्ट्रांतही (युनायटेड किंगडम म्हणजे यूकेतही) भारतीय घरांमध्ये दिवाळी आगळीवेगळी असते. प्रत्येक भारतीय धूमधडाक्यात दिवाळी साजरी करतो. शिक्षणाचे माहेरघर असलेल्या येथील विद्यापिठांतही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात दिवाळी सेलिब्रेशन करतात. युनिव्हर्सिटी ऑफ ससेक्सच्या वतीने तर दिवाळीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याला ४०० ते ५०० लोकांची उपस्थिती सहज असते. याव्यतिरिक्त लंडन शहरातून दिवाळीनिमित्त एक मोठी मिरवणूक निघते. त्यात अनेक भारतीय आणि विदेशी लोक सहभागी होतात. मिरवणुकीमध्ये भारतीय वाद्ये, नाच आणि कपडे यांचे मनोहारी दर्शन होते. आयुर्वेदिक मसाज (आपल्याकडील अभ्यंगस्नान), मेंदी, साडी नेसणे आणि नेसविणे या साऱ्या पारंपरिक गोष्टी हौसेने केल्या जातात. विदेशी नागरिकही या समारंभात आनंदाने सहभागी होतात.

९. हरेकृष्ण आणि स्वामीनारायण मंदिरांतून देशोदेशी साजरी होणारी दिवाळी !

देशोदेशी पसरलेल्या हरेकृष्ण मंदिरांतून आणि स्वामीनारायण मंदिरांमधूनही दिवाळी साजरी केली विशेषतः हरेकृष्ण मंदिरांतील शेंडी ठेवलेले, धोतर नेसून हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे, हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे करत नाचणारे आणि घंटोन्घंटे हार्मोनियमवर हा जप वाजविणारे विदेशी भक्त दिवाळीची वाट पहात असतात. न्यूझीलंडमधील भारतीय मंदिरांतून दिवाळीनिमित्त अन्नकूट म्हणजे अन्नकोटाचे आयोजन होते. भक्तमंडळी अक्षरशः सहस्रो प्रकारचे पदार्थ बनवून ते आकर्षकरित्या मांडून ठेवतात. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी होणारे चोपडीपूजन हे या मंदिरांमधून, तसेच विविध भारतीय दुकानांमध्ये केले जाते. अनेक भारतीय दुकाने या दिवशी आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना हिशेबाच्या वह्यांचे पूजन करण्यासाठी बोलावून मिठाई आणि बोनस वाटतात. आनंदाची ही दिवाळी सगळीकडेच चैतन्याचे कोंदण लावत जाते. भारतीय दिवाळी आता अशी जागतिक होते आहे !

(संदर्भ : सनातन प्रभात)





बालांगण

मधुर सनई

सनई म्हणजेच शहनाई हे भारतीय शास्त्रीय आणि लोकसंगीतामधील एक अतिशय महत्त्वाचे वाद्य आहे. हे वायुवाद्य या प्रकारात मोडते. सनईचे सूर मधुर आणि शुभ असतात. त्यामुळे लग्न, मंगलकार्य, धार्मिक विधी यामध्ये सनई पारंपरिकरित्या वापरली जाते. सनई मुघल दरबारात विकसित झाली, असे म्हटले जाते. 'शाह' आणि 'नाई' म्हणजे संगीतकार या शब्दांपासून शहनाई आणि त्यापासून पुढे 'सनई' हा शब्द तयार झाला. प्राचीन काळी ती केवळ दरबारात आणि मंदिरात वाजवली जात होती. नंतर ती लोकसंगीताचा महत्त्वाचा भाग बनली.

सनई साधारणतः लाकडापासून तयार केली जाते. तिचा देह शंकूसारखा असतो. एका टोकाला रीड बसवलेली असते. त्यातून फुंकर मारली जाते. दुसऱ्या टोकाला धातूची किंवा लाकडाची फुगीर बेल असते. सनईला साधारण ६ ते ९ छिद्रे असतात.त्यामुळे विविध स्वर निर्माण होतात.

सनई वाजवण्यासाठी कलाकाराला श्वास आणि ओठांचा ताण योग्य प्रमाणात नियंत्रित करावा लागतो. छिद्रांवरील बोटांची पकड बदलून विविध सूर काढले जातात. सनई वाजवण्यासाठी श्वास घेण्याची तंत्रशुद्ध पद्धत वापरली जाते. त्यामुळे सनई वाजवणे मोठे कौशल्य मानले जाते.चित्रपटसंगीतातही सनईला विशेष स्थान मिळाले आहे. वसंत देसाई आणि नौशाद यांच्यासारख्या संगीतकारांनी सनईचा भावपूर्ण वापर केला. भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खान हे आजवरचे सर्वश्रेष्ठ सनईवादक आहेत. त्यांनी सनईला केवळ लोकवाद्य न ठेवता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले. सनईचे सूर भारतीय परंपरेचा अविभाज्य भाग आहेत.



ओळख वाद्यांची

सफर ज्योतिर्लिंगांची

शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. ही ज्योतिर्लिंगं भारतात आहेत. महाराष्ट्रात तीन ज्योतिर्लिंगं आहेत. चला तर, या ज्योतिर्लिंगांची सैर करूया.

- गुजरातमधल्या सौराष्ट्रमध्ये सोमनाथ मंदिर आहे. हे जगातलं पहिलं ज्योतिर्लिंग असल्याचं म्हटलं जातं. सोमनाथचं बरंच महत्त्व आहे. समुद्रकिनारी वसलेल्या सोमनाथाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात.
- मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग आंध्र प्रदेशमधल्या श्रीशैल पर्वतावर आहे. या स्थानाला कैलास पर्वताइतकं महत्त्व आहे. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठावर वसलं आहे.
- केदारनाथ ज्योतिर्लिंगही खूप प्रसिद्ध आहे. उंच पर्वतावर वसलेल्या केदारनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी झालेली असते. थंडीत या भागात बर्फ पडतो. म्हणून हे मंदिर बंद ठेवण्यात येतं. बर्फ वितळू लागल्यावर केदारनाथ भाविकांसाठी खुलं होतं.
- पुण्याजवळ भीमाशंकर ज्योतिर्लिंग आहे. सह्याद्री पर्वतावर भीमाशंकराचं मंदिर आहे. हे मंदिरही खूप सुंदर आहे.
- मध्य प्रदेशमध्ये इंदूरजवळ ओंकारेश्वर मंदिर आहे. या ज्योतिर्लिंगाचा आकार ओमसारखा वाटत असल्यामुळे ओंकारेश्वर हे नाव पडलं.
- उज्जैनमध्ये महाकालेश्वर ज्योतिर्लिंग आहे. या ज्योतिर्लिंगाचं तोंड दक्षिणेकडे आहे आणि हेच याचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. या मंदिरात पहाटे भस्मारती होते. ही भस्मारती खूप प्रसिद्ध आहे.
- बनारसमध्ये विश्वेश्वराचं मंदिर आहे. हे मंदिर काशी विश्वेश्वर या नावाने ओळखलं जातं. गंगा नदीच्या किनारी वसलेलं हे मंदिर भक्तांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.
- नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे. गोदावरी नदीच्या किनारी असणारं हे मंदिर आणि आसपासचा परिसर खूपच सुंदर आहे. या मंदिराजवळ ब्रह्मगिरी नावाचा पर्वत आहे. इथूनच गोदावरी नदीचा उगम होतो.
- वैद्यनाथ ज्योतिर्लिंग झारखंडमध्ये आहे. हे स्थान वैद्यनाथ धाम या नावाने ओळखलं जातं.
- गुजरातमध्ये नागेश्वर ज्योतिर्लिंग आहे. नागेश्वर म्हणजे नागांची देवता. भगवान शंकर ही नागांची देवता असल्यामुळे नागेश्वर असंही म्हटलं जातं.
- तामीळनाडूमधल्या रामनाथपुरममध्ये रामेश्वरम ज्योतिर्लिंग आहे. हे स्थान हिंदू धर्मातल्या अत्यंत पवित्र अशा चार धामांपैकी एक आहे. या ज्योतिर्लिंगाची स्थापना श्रीरामाने केल्याचं म्हटलं जातं. म्हणून हे स्थान रामेश्वरम या नावाने ओळखलं जातं.
- महाराष्ट्रात औरंगाबादजवळ घृष्णेश्वर महादेव मंदिर आहे. या स्थानाला घुश्मेश्वर असंही म्हटलं जातं. इथेही भाविकांची मोठी गर्दी झालेली असते.

धार्मिक ज्ञान



बर्फ का पडतो?



थंडीत बऱ्याच ठिकाणी बर्फ पडत असल्याचं तुम्ही बघितलं असेल. हिमाचल प्रदेश, काश्मीर अशा ठिकाणी बर्फ पडतो. इथे तुम्ही फिरायलाही गेला असाल. आता आकाशात हा पांढराशुभ्र बर्फ कसा तयार होतो आणि तो पृथ्वीवर कसा पडतो हे जाणून घेऊ.

सूर्याच्या उष्णतेमुळे नदी, तलाव, समुद्राच्या पाण्याचं बाष्पीभवन होतं. या पाण्याचं रुपांतर वाफेत होतं. हवेपेक्षा हलकी असणारी वाफ तरंगत आकाशाच्या दिशेने जाऊ लागते. या वाफेचं रुपांतर ढगांमध्ये होतं. या ढगांमधून पाऊस पडतो. पण काही वेळा हे ढग वातावरणात अधिक वर जातात. या भागातलं तापमान खूप कमी असतं. या कमी तापमानामुळे ढगांमधलं पाणी गोठतं. त्याचं रुपांतर बर्फाच्या छोट्या कणांमध्ये होतं. या कणांचं वजन हवेपेक्षा जास्त असतं. हवेला वजन न पेलवल्यामुळे बर्फाचे कण खाली पृथ्वीवर येतात. यालाच बर्फवृष्टी किंवा बर्फ पडणं असं म्हटलं जातं. बर्फ पडू लागल्यावर सगळीकडे बर्फाची पांढरी चादर पसरते. हे दृश्य खूप छान दिसतं. तुमच्यापैकी काहींनी याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असेल. बऱ्याचजणांनी हे दृश्य टीव्हीवरही बघितलं असेल.

काही ठिकाणी भरपूर बर्फ पडतो. मग इथले लोक इग्लू तयार करतात. इग्लू हे एस्कीमो प्रजातीच्या लोकांचं घर असतं. इग्लू बर्फापासून तयार केलं जातं. बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना आर्क्टिक हिस्टिरिया नावाचा आजार होण्याची शक्यता असते. उत्तर ध्रुवावर राहणाऱ्या लोकांना हा आजार होतो. त्यामुळे बर्फ कितीही छान वाटला तरी फार काळ त्याची मजा लुटता येत नाही.

जिज्ञासू व्हा

देशोदेशीच्या गुप्तचर संस्था

प्रत्येक देशाचे गुप्तचर विभाग असतात. छत्रपती शिवाजी महाराजांचंही गुप्तचर खातं होतं. बहिर्जी नाईक या खात्याचे प्रमुख होते. शत्रुच्या गोटातल्या हालचालींची माहिती महाराजांपर्यंत पोहोचवण्याचं काम बहिर्जी नाईक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलं. भारताची ङ्गरॉङ्ब ही गुप्तचर संस्था आहे.

देशोदेशीच्या गुप्तचर संस्थांविषयी...

= ङ्गरिसर्च अँड ॲनॅलिसिस विंगङ्ब म्हणजे ङ्गरॉङ्ब ही भारताची गुप्तचर संस्था. या संस्थेची स्थापना १९६८ मध्ये झाली. या संस्थेचं मुख्य कार्यालय नवी दिल्लीत आहे. इंटेलिजन्स ब्युरो म्हणजे आयबी ही संस्थाही देशाच्या सुरक्षेसाठी काम करते. या दोन्ही संघटना देशावरचं संकट रोखण्यासाठी प्रयत्नशील असतात.



= फेडरल सिक्युरिटी सर्व्हिस ही रशियाची गुप्तचर संस्था आहे. या संस्थेची स्थापना २० एप्रिल १९९५ रोजी झाली.

= मिनिस्ट्री ऑफ स्टेट सेक्युरिटी ही चीनची गुप्तचर संस्था. या संस्थेची स्थापना १९८३ मध्ये झाली.

= सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी म्हणजे सीआयए ही अमेरिकेची गुप्तचर संस्था आहे. या संस्थेतले अधिकारी सतत कार्यरत असतात. १९४७ मध्ये या संस्थेची स्थापना करण्यात आली. विविध प्रकारचे गुन्हे, दशहतवाद रोखण्याच्या दृष्टीने सीआयए काम करते.

= डीजीएसई ही फ्रान्सची गुप्तचर संस्था आहे. ही संस्था इतर देशांच्या गुप्तचर संस्थापेक्षा वेगळी आहे. सरकारला संभाव्य दहशतवादी हल्ल्यांबाबत माहिती देणं हे या संस्थेचं मुख्य काम आहे. १९८२ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेत पाच हजार कर्मचारी आहेत.



महत्त्वाचं काही...

नर्मदा

नर्मदा भारतातील भारतातील एक महत्त्वाची व पवित्र नदी आहे. तिचा उगम मध्यप्रदेश राज्यातील अमरकंटक पर्वतरांगामध्ये होतो. नर्मदा नदीची लांबी साधारणपणे १३१२ किलोमीटर आहे. भारतातील बहुतेक नद्या पूर्वेकडे बंगालच्या उपसागराला मिळतात.पण नर्मदा मात्र पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहत जाते आणि शेवटी अरबी समुद्राला मिळते.

नर्मदा नदी मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांतून वाहते. तिच्या काठावर मोठी शहरे आणि गावे वसलेली आहेत. शेती, पाणीपुरवठा आणि वीज निर्मिती यासाठी नर्मदा नदीच्या पाण्याचा वापर केला जातो. हिंदू धर्मात नर्मदा नदीला देवी मानले जाते. अनेक लोक 'नर्मदा परिक्रमा व्रत' करतात. या परिक्रमेत नदीच्या काठाने चालत तिची पूर्ण प्रदक्षिणा केली जाते. महेश्वर, ओंकारेश्वर, होशंगाबाद यांसारखी अनेक पवित्र ठिकाणे नर्मदा नदीच्या किनारी आहेत.



जीवनदायिनी नदी

नर्मदा नदीच्या पाण्यावर अनेक मोठे प्रकल्प उभारले गेले आहेत. त्यापैकी 'सरदार सरोवर धरण' हा सर्वांत प्रसिद्ध प्रकल्प आहे. नर्मदा नदीच्या दऱ्या, निसर्गसंपदा आणि सौंदर्यामुळे ती पर्यटनासाठीही ओळखली जाते. मार्बल रॉक म्हणून प्रसिद्ध असलेल्या भेडाघाट या ठिकाणीनर्मदा नदी संगमरवरी कड्यांच्या मधून वाहते. सूर्यप्रकाशात हे चमकते दृश्य खूप मोहक दिसते. इथे बोटिंगचीही सोय आहे आणि हजारो पर्यटक दरवर्षी हे ठिकाण पाहायला येतात.

गहू, कापूस, डाळी, फळे आणि भाज्या यांची शेती नर्मदा नदीच्या काठावर फुलली आहे. कारखान्यांमुळे आणि चुकीच्या वापरामुळे होणारे प्रदूषण, जंगलतोड यामुळे नदीच्या प्रवाहावर परिणाम होतो आहे. सरकार आणि समाज या दोघांनी मिळून नर्मदा स्वच्छ ठेवली तरच तिचे जीवनदायी महत्त्व टिकून राहील.

इंटरनेटविना डिजिटल शिक्षण!

वर्गात शिक्षक फळ्यावर काहीतरी आकृती काढत आहेत आणि ती समजून घेण्याचा आपण प्रयत्न करत आहोत, असे चित्र अनेकांच्या ओळखीचे असेल. पण तीच आकृती पडद्यावर हलताना दिसली, तिचे वेगवेगळे भाग उलगडले आणि त्यातून धडा समजला, तर शिकण्याची मजा आणखी वाढणार नाही का? बिहारमधील सराई टांड गावातील सरकारी उच्च माध्यमिक शाळेने विद्यार्थ्यांना शिकण्याचा असाच नवा अनुभव दिला आहे. या शाळेत इंटरनेट नसले, तरी डिजिटल पद्धतीने शिकता येते. गावापासून सुमारे ६३ किलोमीटर अंतरावर असलेल्या गया जिल्ह्याच्या केंद्रापर्यंत पोहोचणे अनेकांसाठी कठीण असते. त्यामुळे आजूबाजूच्या सहा गावांतील मुलांसाठी ही शाळा शिक्षणाची महत्त्वाची वाट आहे.

या शाळेत ६६० विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्मार्ट वर्गखोली तयार करण्यात आली आहे. येथे १४ शिक्षक डिजिटल स्क्रीनच्या मदतीने शिकवतात. पुस्तकातील धडा, फळ्यावरचे चित्र आणि शिक्षकांचे स्पष्टीकरण यांसोबत आता ॲनिमेशन, चित्रफिती, प्रात्यक्षिके आणि सरावाचे उपक्रमही पाहायला मिळतात. विज्ञानातील एखादी अवघड संकल्पना केवळ वाचण्याऐवजी स्क्रीनवर पाहता येते. त्रिमितीय प्रतिमेमुळे (थ्रीडी इमेज) एखाद्या वस्तूची रचना अधिक स्पष्ट होऊ शकते, तर चित्रफितीमुळे कठीण वाटणारा विषय पुन्हा समजून घेता येतो. विशेष म्हणजे, या वर्गातील शैक्षणिक साहित्य संगणकात साठवलेले असल्याने इंटरनेटची जोडणी व्यवस्थित नसली, तरी शिकवणी थांबत नाही. शिक्षकांना या साधनांचा वापर करता यावा, यासाठी प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

ज्ञानजगत





सराई टांडमधील हा बदल म्हणजे देशभर सुरू असलेल्या डिजिटल शिक्षणप्रवासाचे एक उदाहरण आहे. देशातील दीड लाखाहून अधिक शाळांचा सरकारी डिजिटल शिक्षण उपक्रमांमध्ये समावेश आहे. 'दीक्षा' आणि 'पीएम ई-विद्या' यांसारख्या योजनांमधूनही विद्यार्थ्यांना डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जाते. मात्र, वर्गात स्क्रीन बसवणे एवढ्यानेच डिजिटल शिक्षण यशस्वी होत नाही. त्यासाठी योग्य व्यवस्था, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देणारे उपक्रम आवश्यक असतात. तंत्रज्ञानामुळे शिक्षकांची जागा घेतली जात नाही, उलट त्यांना विषय अधिक सोप्या पद्धतीने समजावून सांगण्याचे नवे साधन मिळते. फळा, पुस्तक आणि शिक्षक यांच्यासोबत आलेली ही 'डिजिटल खिडकी' मुलांसाठी ज्ञानाचे नवे जग उघडू शकते.

हिमालयातील अज्ञात प्राणी

डोंगराच्या उंचच उंच रांगा, दाट जंगल, बांबूची झाडी आणि हिरवीगार कुरणे... या निसर्गरम्य प्रदेशात एक असा प्राणी राहतो, ज्याच्याबद्दल शास्त्रज्ञांनाही अजून बरेचकाही जाणून घ्यायचे आहे. त्याचे नाव आहे 'मिश्मी टाकिन'. अरुणाचल प्रदेशातील मिश्मी टेकड्या हा त्याचा महत्त्वाचा अधिवास. धिप्पाड शरीर, दाट केसाळ अंग, वळलेली शिंगे आणि नाकाचा आगळावेगळा आकार यामुळे हा प्राणी शेळी आणि रानटी बैल यांचे मिश्रण असल्यासारखा दिसतो. भारताच्या ईशान्येकडील या पर्वतीय भागाबरोबरच चीन आणि म्यानमारच्या काही भागांतही तो आढळतो. मात्र, दाट जंगलात आणि उंच डोंगरांमध्ये राहणारा हा प्राणी सहज नजरेस पडत नाही. त्यामुळे त्याचे जीवन समजून घेणे हे संशोधकांसाठी मोठे आव्हान आहे.

मिश्मी टाकिन नेमका कुठे राहतो, काय खातो आणि ऋतू बदलल्यावर कुठे जातो, याचा शोध घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली. जंगलात लावलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये या प्राण्याची तब्बल १७ हजारांहून अधिक छायाचित्रे टिपली गेली. या छायाचित्रांचा अभ्यास करताना संशोधकांनी स्थानिक आदिवासी समुदायांकडून मिळालेल्या पारंपरिक ज्ञानाचाही उपयोग केला. कारण अनेक पिढ्यांपासून जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांना तेथील प्राणी, वनस्पती आणि ऋतुमानातील बदलांची चांगली माहिती असते. कॅमेऱ्यातील नोंदी, प्रत्यक्ष पाहणी आणि स्थानिक लोकांचे अनुभव यांची सांगड घातल्यामुळे टाकिनच्या हालचाली, त्याचे कळप आणि तो वापरत असलेले प्रदेश यांविषयी अधिक माहिती मिळाली. उन्हाळ्यात तो अधिक उंचावरील भागांतही जातो, तर पावसाळ्यात काही ठिकाणी त्याचे मोठे कळप दिसू शकतात.





या प्राण्याच्या अस्तित्वासाठी जंगल, बांबूची बेटे, झुडपे आणि डोंगरावरील गवताळ प्रदेश महत्त्वाचे आहेत. या ठिकाणी त्याला अन्न मिळते, आडोसा मिळतो आणि सुरक्षितपणे वावरण्याची संधी मिळते. मात्र, शिकारीमुळे त्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. त्याची संख्या किती आहे आणि तो नेमक्या कोणत्या भागांत राहतो, याविषयी अजून अधिक संशोधनाची गरज आहे. म्हणूनच जंगलाचे संरक्षण करताना केवळ एखाद्या प्राण्याकडे लक्ष देऊन चालत नाही; त्याच्या संपूर्ण अधिवासाची काळजी घ्यावी लागते. निसर्गातील प्रत्येक जीवाचे जगणे त्याच्या भोवतालच्या पर्यावरणाशी जोडलेले असते. जंगल सुरक्षित राहिले, तरच या गूढ पर्वतीय प्राण्याचे अस्तित्व टिकून राहू शकते.

ज्ञानजगत

दोस्त हे मस्त

काटेदार साळिंदर



साळिंदर नावाचा एक प्राणी आहे. साळींदरच्या शरीरावर टोकदार काटे असतात. हा प्राणी या काट्यांनी शत्रूवर हल्ला चढवतो. साळींदर फार बाहेर पडत नाही. त्याला बिळात लपून रहायला आवडतं. तो अन्न शोधण्यासाठी बिळाबाहेर पडतो. त्याला अंधार जास्त आवडतो. साळींदर झाडावर चढू शकतो. साळीच्या शरीराच्या मागच्या भागात भरपूर काटे असतात. उर्वरित शरीरावरचे केस मात्र मऊ असतात. या काट्यांची संख्या जवळपास ३० हजारांच्या घरात असते. काही काळानंतर जुने काटे पडून जातात आणि त्या जागी नवे काटे येतात. साळींदर पाच ते सात वर्षं जगतात.

खादाडी

पौष्टिक नूडल्स सॅलड



तुम्हाला नूडल्स तर आवडतच असतील. तुम्ही नूडल्स सॅलड ही रेसिपी बनवू शकता. यासाठी एक कप उकडलेले नूडल्स, ब्रोकोली, गाजर, सिमला मिरची, टोमॅटो, कोबी, कांदा आणि कांद्याची पात अशा भाज्या बारीक चिरून घ्या. एक चमचा ऑलिव्ह ऑईल, दोन हिरव्या मिरच्या, पाव चमचा हळद, चार ते पाच काजू, मीठ, मिरपूड, बारीक चिरलेली कोथिंबिर हे साहित्य घ्या. एका कढईत ऑलिव्ह ऑईल घालून थोडं गरम करा. त्यात हळद घाला. मग सगळ्या भाज्या घालून दोन मिनिटं परता. त्यात मीठ आणि मिरपूड घालून हलवून घ्या. मग उकडलेले नूडल्स, काजूचे तुकडे आणि कोथिंबिर घाला. एक मिनिट शिजवून घ्या. तुमचं नूडल सॅलड तयार आहे. हे सॅलड सॉस घालून खाता येईल.

स्टडी टिप्स

आनंदी राहा!



परीक्षा आल्यावर तुम्हाला खूप ताण येतो. तुम्ही घाबरून जाता. पण परीक्षेचा ताण घेण्यापेक्षा या दिवसात आनंदी रहा. परीक्षेत चांगले गुण मिळवणं गरजेचं आहे. पण फक्त पाठांतर करण्यापेक्षा विषय नीट समजून घ्या. तुम्हाला ज्ञान मिळायला हवं. विषयाचा पाया बळकट असेल तर तुम्हाला परीक्षेत कोणतीही अडचण येणार नाही. इतरांशी नाही तर स्वत:शी स्पर्धा करा. स्वत:चं ज्ञान वाढवण्यासाठी भरपूर वाचा. स्वत:च्या अभ्यासाचं नीट नियोजन करा. शेवटच्या टप्प्यात सराव आणि उजळणीवर भर द्या.

योगा टाईम

तुम्हाला राग येतो का?



तुम्हाला राग येतो का, तुम्ही सारखी चिडचिड करता का... मग तुम्ही काही योगासनं करायला हवीत. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी उनमामी मुद्रा करता येईल. ही मुद्रा करण्यासाठी पद्मासनात किंवा मांडी घालून बसा. डोळे मिटून आपलं सगळं लक्ष भुवयांच्या मध्यभागी केंद्रित करा. हे आसन करताना मनात कोणतेही विचार येऊ देऊ नका. यामुळे तुमची एकाग्रताही वाढू शकेल. ताण कमी झाल्यामुळे चिडचिड कमी होईल. परीक्षेच्या काळात हे आसन केल्यामुळे बरेच लाभ मिळू शकतील.

भारताची विजयी गर्जना

सॅफ फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा; पाकिस्तानला भारताचा झटका



। ढाका । वृत्तसंस्था ।

सॅफ चॅम्पियनशिप २०२६चा पहिला सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानचा ३-२ ने दणदणीत पराभव केला. भारताने सॅफ चॅम्पियनशिपमध्ये विजयाने शानदार सुरुवात केली.

बांग्लादेशातील ढाका नॅशनल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या हाय-व्होल्टेज सामन्यात, भारतीय खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखले आणि पहिल्याच हाफमध्ये ३ गोल केले. सामन्याच्या शेवटच्या क्षणी पाकिस्तानने पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत दोन गोल केले असले तरी, ते भारताला जिंकण्यापासून रोखू शकले नाहीत. भारताच्या या विजयाचा हिरो सुहेल भट्ट होता, ज्याने सामन्यात २ गोल केले.

पाकिस्तानी गोलरक्षकाने चेंडू थांबवण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. त्यामुळे, पहिल्या हाफच्या अखेरीस भारतीय संघाने ३-० अशी भक्कम आघाडी घेतली होती. दुसरीकडे, पाकिस्तानी संघाला पहिल्या हाफमध्ये भारतीय बचाव भेदण्यात अपयश आले.

भारताने पहिल्या हाफमध्ये केले ३ गोल

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. सामन्याच्या १३ व्या मिनिटाला, मोहम्मद सोहेलच्या अप्रतिम पासवर सुहेल भट्टने गोल करून भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. सात मिनिटांनंतर, १९ व्या मिनिटाला, सुहेल भट्टने पुन्हा एकदा गोल केला. या गोलमुळे भारताची आघाडी २-० अशी वाढली. यानंतरही भारतीय संघाने आपले आक्रमण सुरूच ठेवले आणि २३ व्या मिनिटाला मंगलनथांग किपगेनने तिसरा गोल करून पाकिस्तानच्या अडचणीत भर घातली.

दुसऱ्या हाफमध्येही भारताने राखले वर्चस्व

दुसऱ्या हाफमध्येही भारतीय संघाने आपले वर्चस्व कायम ठेवत पाकिस्तानला गोल करण्याची एकही संधी दिली नाही. भारत हा सामना ३-० ने सहज जिंकेल असे वाटत होते, पण इंज्युरी टाइममध्ये पाकिस्तानने अचानक सामन्याचे चित्र पालटले. ९१ व्या मिनिटाला नजीब उल्लाहने पाकिस्तानचा पहिला गोल करून स्कोअर ३-१ असा केला.

त्यानंतर पाकिस्तानी खेळाडू आक्रमक झाले आणि ९४ व्या मिनिटाला अली खान गाझीने विलक्षण चपळाई दाखवत दुसरा गोल केला. या गोलमुळे स्कोअर ३-२ झाला. मात्र, त्यानंतर पाकिस्तानला बरोबरीचा गोल करता आला नाही. अखेरीस, भारतीयांनी आपली आघाडी कायम राखली आणि सामना ३-२ ने जिंकला.

खेलो इंडिया युथ गेम्ससाठी खो-खोपटूंची कसोटी

तेलंगणातील राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ निवड; आवश्यक कागदपत्रे सोबत आणण्याचे आवाहन

। पुणे । प्रतिनिधी ।

आगामी आठव्या खेलो इंडिया युथ गेम्स २०२६ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्यातील युवा खो-खोपटूंना संधी मिळणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघांची राज्यस्तरीय निवड चाचणी ६ नोव्हेंबर रोजी पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आली आहे.

आगामी ११ ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत तेलंगणा येथे आठव्या खेलो इंडिया युथ गेम्सचे आयोजन करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खो-खो संघांची निवड करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सहकार्याने ही चाचणी घेण्यात येणार आहे.

निवड चाचणीसाठी इच्छुक खेळाडूंनी ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. खेळाडूंचे मैदानावरील कौशल्य आणि कामगिरी पाहून महाराष्ट्राच्या मुला-मुलींच्या संघासाठी गुणवंत खेळाडूंची निवड होणार आहे.

निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आधारकार्ड किंवा पासपोर्ट, इयत्ता दहावीचे प्रमाणपत्र, जन्मतारखेच्या पाच वर्षांच्या आत वितरित केलेला मूळ जन्मदाखला आणि शाळेचे बोनाफाइड प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. याशिवाय सराव आणि निवड चाचणीसाठी आवश्यक स्पोर्ट्स शूजही आणावेत.

निवड चाचणीच्या दिवशी खेळाडूंसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे खेळाडूंनी वेळेत उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रे आणि क्रीडा साहित्य सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.तसेच महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

पी.व्ही.सिंधू वर्ल्ड टूरच्या अंतिम फेरीस पात्र



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताची स्टार बॅडमिंटनपटू आणि दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिने डिसेंबरमध्ये होणाऱ्या बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर फायनल्समध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. वय हा सर्वोत्तम कामगिरी करण्यातील अडथळा नसल्याचे सांगताना सिंधूने ङ्क३१ हे नवे २१फअसल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला. चीनमध्ये ९ ते १३ डिसेंबरदरम्यान वर्ल्ड टूर फायनल्स स्पर्धा होईल.

महिला एकेरीतील सुवर्णपिढीतील खेळाडूंमध्ये सिंधूचा समावेश होतो. कॅरोलिना मरिन, नोझोमी ओकुहारा, रॅचनोक इंतानोन आणि ताई झू यिंग यांसारख्या दिग्गज खेळाडूंसोबत तिने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या वर्ल्ड टूर पात्रता क्रमवारीत सिंधू पाचव्या स्थानावर असून पहिल्या आठ खेळाडूंना या स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. सिंधूने रविवारी हायलो ओपन सुपर ५०० स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. हे तिचे यंदाच्या मोसमातील दुसरे विजेतेपद ठरले. यापूर्वी तिने जुलैमध्ये जपान ओपन जिंकली होती, तर गेल्या महिन्यात फ्रेंच ओपनमध्ये उपविजेतेपद मिळवले होते.

आपल्या कारकिर्दीतील पूर्वीचे वर्चस्व पुन्हा मिळवू शकते का, या प्रश्नावर सिंधूने ठामपणे सकारात्मक उत्तर दिले. नक्कीच! का नाही? तुम्ही शरीराची योग्य काळजी घेतली, तर हे शक्य आहे. सध्या अनेक खेळाडू ३०, ३१ आणि ३२व्या वर्षीही सर्वोच्च स्तरावर खेळत आहेत. त्यामुळे पुन्हा अव्वल स्थानावर पोहोचण्यात अडचण काय? मी त्या दिशेने वाटचाल करत आहे. मला माहीत आहे की मी अजूनही हे करू शकते, असे ती म्हणाली.

भारताने केला नेपाळचा पराभव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या अंडर-१९ संघाने आशिया कपमध्ये नेपाळचा १० विकेट्सने पराभव केला. नेपाळचा संघ प्रथम फलंदाजी करताना ४२.३ षटकांत १२८ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात भारताने १९.१ षटकांत एकही विकेट न गमावता १२९ धावा करून सामना जिंकला. भारताला कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांनी शानदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ११५ चेंडूंवर नाबाद १२९ धावांची भागीदारी केली.

वडोदरा, मुंबई येथे रंगणार महिला प्रीमियर लीगचे पाचवे पर्व

। मुंबई । प्रतिनिधी ।



महिला प्रीमियर लीगच्या पाचव्या हंगामाचे वेळापत्रक भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने जाहीर केले आहे. २०२७ मधील ही स्पर्धा १४ जानेवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत वडोदरा आणि मुंबई येथे खेळवली जाणार आहे. दोन्ही शहरांमध्ये प्रत्येकी ११ सामने होणार आहेत.

स्पर्धेची सुरुवात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दोन वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्स यांच्यातील रंगतदार लढतीने होणार आहे. १४ जानेवारी रोजी या दोन संघांमध्ये सलामीचा सामना खेळवला जाईल. बीसीसीआयने स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर करताना सामन्यांच्या ठिकाणांचीही अधिकृत घोषणा केली.

वडोदरा येथील कोटांबीमधील नव्या बीसीए स्टेडियमवर पहिल्या टप्प्यातील सामने होतील. त्यानंतर मुंबईतील क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर उर्वरित सामने खेळवले जातील. प्लेऑफ आणि अंतिम सामनाही ब्रेबॉर्न स्टेडियमवरच होणार आहे.

वडोदरा येथे १४ ते २४ जानेवारीदरम्यान स्पर्धेतील ११ सामने खेळवले जातील. या टप्प्यात पाचही संघ विजेतेपदाच्या शर्यतीत आपली मोहीम सुरू करतील. त्यानंतर २६ जानेवारीपासून स्पर्धेचा पुढील टप्पा मुंबईत रंगणार आहे.

मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर उर्वरित ११ सामने होतील. साखळी फेरीतील सामने ३ फेब्रुवारीपर्यंत खेळवले जाणार आहेत.

विशाखापट्टणमला श्रीलंकेचा सामना



विशाखापट्टणम : भारत आणि श्रीलंका यांच्यात १३ डिसेंबर रोजी होणारा पहिला वनडे आता दिल्लीमध्ये नव्हे, तर विशाखापट्टणम येथे खेळवला जाणार आहे. बीसीसीआयने गुरुवारी ठिकाण बदलल्याची माहिती दिली.यापूर्वी दिल्ली अँड डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनने संभाव्य हवामानविषयक अडचणी आणि स्टेडियममध्ये प्रस्तावित नूतनीकरण म्हणजेच दुरुस्ती व सुधारणा कामे लक्षात घेऊन सामन्याचे ठिकाण बदलण्याची विनंती केली होती. डिसेंबरमध्ये दिल्लीतील हवामानाची परिस्थिती सामन्याच्या आयोजनावर परिणाम करू शकते. त्यामुळे सामन्यादरम्यान हवामानाशी संबंधित अडथळ्याची शक्यता लक्षात घेण्यात आली. दुसरे कारण अरुण जेटली स्टेडियममध्ये प्रस्तावित नूतनीकरणाचे काम आहे. स्टेडियममध्ये बांधकाम आणि सुधारणा करण्याचे काम होणार आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सामन्यापूर्वी मैदान आणि प्रेक्षकांसाठी आवश्यक व्यवस्था वेळेत पूर्ण करण्याबाबत चिंता होती.

निवडक

हसी कांगारूंचे कोचिंग कन्सल्टंट

नवीदिल्ली : ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज फलंदाज मायकल हसी यांची राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या कोचिंग सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या ॲशेस मालिकेसह वनडे विश्वचषकाच्या तयारीत ते संघाला मदत करतील. याशिवाय, २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिक आणि ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी संघाची टी-२० रणनीती तयार करण्यातही त्यांची महत्त्वाची भूमिका असेल.हसी यांची नवी जबाबदारी इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या आगामी टी-२० मालिकेपासून सुरू होईल. त्यानंतर पर्थ येथे न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेच्या तयारीतही ते संघाला मदत करतील. या काळात ते मुख्य



प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांच्यासोबत काम करतील.हसी यांनी यापूर्वीही काही काळ ऑस्ट्रेलियन संघासोबत फलंदाजी सल्लागाराची भूमिका बजावली आहे. मात्र, समालोचन आणि क्रिकेटशी संबंधित इतर जबाबदाऱ्यांमुळे ते दीर्घकाळ संघासोबत जोडले जाऊ शकले नव्हते.यावर्षी न्यूझीलंडचे माजी कर्णधार स्टीफन फ्लेमिंग यांनी इंग्लंडच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारली होती. त्यानंतर त्यांनी आपले जुने सहकारी मायकेल हसी यांना इंग्लंडच्या कोचिंग स्टाफमध्ये सहभागी होण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, हसी यांनी ही ऑफर नाकारली. त्यांनी ऑस्ट्रेलियन संघासोबत काम करण्याला प्राधान्य दिले. मायकेल हसी यांच्या समालोचनाच्या आणि जगभरातील टी-२० लीगमधील प्रशिक्षणाच्या जबाबदाऱ्यांमुळे ते आतापर्यंत ऑस्ट्रेलियन संघाला जास्त वेळ देऊ शकत नव्हते. याशिवाय इंग्लंडच्या द हंड्रेड लीगमध्ये वेल्श फायअरच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारीही सांभाळत आहेत.

ख्रिस लेनची शिक्षा १ महिन्यावर

नवी दिल्ली : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ख्रिस लिन याची कोकेन सेवन प्रकरणातील शिक्षा ३ महिन्यांवरून १ महिन्यापर्यंत कमी करण्यात आली आहे. इंग्लंडच्या क्रिकेट नियामकाने शुक्रवारी याची पुष्टी केली. ३६ वर्षीय लिन १८ जुलै रोजी इंग्लंडमध्ये झालेल्या २० ब्लास्ट फायनल्स डेदरम्यान करण्यात आलेल्या अँटी-डोपिंग



चाचणीत दोषी आढळला होता. त्या वेळी तो नॉर्थहॅम्पटनशायरकडून खेळत होता. क्रिकेट नियामकाने मान्य केले की, लिन यांनी स्पर्धेबाहेर कोकेनचे सेवन केले होते. त्याचा खेळातील कामगिरी सुधारण्याशी कोणताही संबंध नव्हता. लिन यांनी पदार्थांच्या गैरवापरावरील पुनर्वसन कार्यक्रमही पूर्ण केला. या कारणांमुळे त्यांची सुरुवातीची ३ महिन्यांची शिक्षा कमी करून १ महिना करण्यात आली. त्यांनी निलंबनाचा कालावधी पूर्ण केला असून आता त्यांच्या खेळण्यावर कोणतीही बंदी नाही. १८ जुलै रोजी २० ब्लास्ट फायनल डे वेळी ख्रिस लिन यांची नियमित अँटी-डोपिंग चाचणी करण्यात आली होती. त्या वेळी ते नॉर्थहॅम्पटनशायर स्टीलबॅक्स संघाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यांच्या मूत्राच्या नमुन्याची तपासणी करण्यासाठी तो फ्रान्समधील वाडा मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत पाठवण्यात आला होता. तपासणीत कोकेनचा मेटाबोलाइट बेंझॉयलेकगोनिन अल्प प्रमाणात आढळून आला. त्यानंतर लिन यांनी डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचे मान्य केले.

महात्मा फुले महाविद्यालयाचा दबदबा

पनवेल : मुंबई विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी स्पोर्ट्स पवेलियन, मरीन लाइन्स, मुंबई येथे १ नोव्हेंबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत पार पडलेल्या मुंबई सिटी झोन, मुंबई सबअर्बन झोन आणि ठाणे झोन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६-२७ या स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ७ पदकांची कमाई केली. या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाने झोनल पातळीवर आपली भक्कम छाप उमटवली आहे. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील असंख्य खेळाडूंमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. स्पर्धेत साहिल साळुंखे ५००० मीटर धावणे सुवर्ण पदक व १०००० मीटर धावणे कांस्य पदक, प्रणव कटेकर तिहेरी उडी सुवर्ण पदक, शिवकन्या ताटे १०००० मीटर धावणे रौप्य पदक, आचल शेळके ५००० मीटर धावणे कांस्य पदक, ओम वरुटे गोळफेक कांस्य पदक तसेच आंचल शेळके, भूमिका पाटील, गौरी गावडे, करीना पवार, शिवकन्या ताटे यांनी ४४०० मीटरमध्ये रिले कांस्य पदक पटकाविले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

तन्वीला युवा ऑलिम्पिकमध्ये बॅडमिंटनचे रौप्य

अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय महिला खेळाडू; फायनलमध्ये चिनी खेळाडूकडून २४-२६ ने पराभूत

। डकार । वृत्तसंस्था ।

सेनेगलच्या डकार येथे सुरू असलेल्या युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारताच्या तन्वी पात्रीने बॅडमिंटन महिला एकेरीत रौप्यपदक जिंकले आहे.

गुरुवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात तन्वीला चीनच्या विद्यमान जागतिक ज्युनियर चॅम्पियन झांग यी शिनने २१-१५, १३-२१, २४-२६ असे पराभूत केले. १ तास २२मिनिटेचाललेल्या या सामन्यात तन्वीने ५ मॅच पॉइंट



वाचवले आणि ३ वेळा सुवर्णपदक जिंकण्याच्या जवळ पोहोचली.

सुरुवातीला तन्वीला लय मिळवण्यासाठी थोडा वेळ लागला. एक वेळ त्या ३-५ अशा पिछाडीवर होत्या. त्यानंतर त्यांनी सलग ७ गुण जिंकून १०-५ अशी आघाडी घेतली. पंच टॉस आणि नेटजवळील शानदार खेळाच्या जोरावर तन्वीने २५ मिनिटांत पहिला गेम २१-१५ असा जिंकला.तन्वीने दुसऱ्या गेमची सुरुवातही चांगली केली आणि ४-० अशी आघाडी घेतली. मात्र, कोर्टवरील वाऱ्याच्या प्रवाहामुळे त्यांच्या शॉट्सवरील नियंत्रण प्रभावित झाले. मिड-गेम इंटरव्हलनंतर झांगने खेळावर पकड मिळवली आणि २१-१३ असा गेम जिंकून सामना १-१ असा बरोबरीत आणला.



कृषीवल आयोजित घरगुती गणेश सजावट स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे विजेते माणगाव येथील विनोद मेहता यांचे बक्षीस अंश मेहता यांनी तर द्वितीय क्रमांकाचे विजेते चेरवली येथील संतोष खडतर यांचे बक्षिस साहिल खडतर यांना माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा यांच्याहस्ते तसेच कृषीवल परिवाराचे सुरेंद्र वेळे व भैरवी पाटील, तालुका प्रतिनिधी सलीम शेख यांच्या उपस्थितीत देऊन गौरविण्यात आले.

(छायाचित्र : सिद्धी दाखिणकर, गांगवली- माणगाव)

शूटिंग वर्ल्ड चॅम्पियनशिप **अंतिम फेरीत २४२.२ गुण मिळवले**

जयपाल मालवीयला रौप्यपदक

। दोहा । वृत्तसंस्था ।

मध्य प्रदेशच्या जयपाल मालवीयने नेमबाजीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकले आहे. त्यांनी गुरुवारी कतारची राजधानी दोहा येथे सुरू असलेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात ही कामगिरी केली.

जयपालने अंतिम फेरीत २४२.२ गुण मिळवत दुसरे स्थान पटकावले. चीनच्या हू काईने २४३.९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

दोघांमध्ये केवळ १.७ गुणांचा फरक राहिला. चेक प्रजासत्ताकच्या जिंदरिच



डुबोवीने २२०.९ गुणांसह तिसरे स्थान मिळवले.

जयपालच्या या कामगिरीमुळे भारताला लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ साठी नेमबाजीतील पहिले कोटा स्थानही मिळाले. मात्र, याचा अर्थ ऑलिम्पिकमध्ये जयपालच भारताचे प्रतिनिधित्व करतील, असा नाही.

कोटा देशाच्या नावावर असतो, खेळाडूच्या नावावर नाही. म्हणजेच भारताला या प्रकारात ऑलिम्पिकसाठी एक स्थान मिळाले आहे. या स्थानावर कोणता खेळाडू सहभागी होईल, याचा निर्णय भारतीय नेमबाजी महासंघाच्या निवड प्रक्रियेनुसार आणि निश्चित केलेल्या चाचण्यांच्या आधारे घेतला जाईल.

या पदकाचे महत्त्व केवळ पदकतालिकेपुरते मर्यादित नाही. जयपालने भारताला लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ साठी १० मीटर एअर पिस्तूलमध्ये एक कोटा मिळवून दिला आहे.

आयएसएसएफच्या नियमांनुसार, दोहा वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या १० मीटर एअर पिस्तूल पुरुषांच्या अंतिम फेरीतील पहिल्या तीन देशांना प्रत्येकी एक कोटा मिळाला. हू काईने चीनसाठी, जयपालने भारतासाठी आणि डुबोवीने चेक रिपब्लिकसाठी हे स्थान मिळवले.

दोहामध्ये या वर्ल्ड चॅम्पियनशिपदरम्यान एकूण १२ वैयक्तिक ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये ३६ कोटे दिले जाणार आहेत. प्रत्येक स्पर्धेत तीन कोटे उपलब्ध आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)